SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीग्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १३.०७.२०२६ | अंक नं. ०८८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# ‘धोकादायक विद्युत यंत्रणा, उघड्या डीपी’बाबत २० जुलैपूर्वी सुधारणा करा अन्यथा महावितरण व मनपा आयुक्तांच्या दालनासमोर ‘बेमुदत उपोषण’

नगर – शहरातील धोकादायक विद्युत यंत्रणा, उघड्या डीपी, झाडांनी वेढलेले खांब आणि अन्य समस्या २० जुलैपूर्वी दूर न केल्यास जागरुक नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि नागरिक मंचाचे पदाधिकारी महावितरण कार्यालय व आयुक्तांच्या दालनासमोर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा सुहास मुळे यांनी दिला आहे.





याबाबतचे निवेदन जागरुक नागरिक मंचच्यावतीने जिल्हाधिकारी, महावितरणचे अधीक्षक अभियंता आणि अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांना देऊन बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

## खाली मुले खेळत असताना वरुन कोसळली लालभडक वीजवाहक तार; स्टेशन रोडवर पुन्हा मोठी दुर्घटना टळली

स्टेशन रोड परिसरातील गाडळकर मळा येथील स्मृती हौसिंग सोसायटी येथे १२ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पुन्हा एकदा मोठी दुर्घटना टळली. विद्युत खांबावरील जिवंत वीजवाहक तार तापून लालभडक झाली आणि मोठ्या आवाजासह रस्त्यावर कोसळली. त्याचवेळी त्या ठिकाणी चार ते पाच मुले खेळत होती. मात्र, जागरूक मंचच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला. यामुळे महावितरणच्या कारभाराविरोधात नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

याबाबत जागरुक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन महावितरणच्या हलगर्जीपणाविरोधात २० जुलैपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. या निवेदनात म्हटले आहे, काही दिवसांपूर्वी आनंदनगर परिसरात विद्युत खांबात प्रवाह उतरल्याने तीन ते चार वर्षांच्या चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतरही महापालिकेचा विद्युत विभाग आणि महावितरण कंपनी यांनी आवश्यक खबरदारी घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्मृती हौसिंग सोसायटी येथे पुन्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठी दुर्घटना घडली असती. मात्र, सुहास मुळे यांनी परिसरातील नागरिक, लहान मुले व जनावरे यांना धोकादायक तारेपासून दूर ठेवले. त्यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांना संपर्क करून घटनास्थळी बोलावण्यात आले. नगरसेविका गीतांजली काळे व ॲड. सुधीर झरकर यांच्या सहकार्याने शटडाऊन घेऊन पडलेली तार पुन्हा जोडण्यात आली आणि वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

मात्र, या घटनेदरम्यान महावितरणच्या आपत्कालीन यंत्रणेतील अनेक त्रुटी समोर आल्याचा आरोप करण्यात आला आहे. आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यासाठी शिडी असलेले वाहन उपलब्ध नसल्याने जवळील बांधकामावरील शिड्या आणून त्यांची जोडणी करून कर्मचाऱ्याला अंधारात काम करावे लागल्याचे सांगण्यात आले. तसेच हेल्पलाइन क्रमांक म्हणून प्रत्यक्ष घटनास्थळी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाच मोबाईल क्रमांक देण्यात आल्याने काम करतानाच त्यांना वारंवार नागरिकांचे फोन स्वीकारावे लागत असल्याची बाबही निदर्शनास आणण्यात आली. याशिवाय स्टेशन रोड परिसरातील अनेक विद्युत खांब झाडांच्या फांद्या व वेलींनी पूर्णपणे झाकले गेले असून अनेक ट्रान्सफॉर्मरखालील डीपीची झाकणे उघडी आहेत. शहरातील विविध भागांतही अशीच धोकादायक परिस्थिती असून संबंधित विभाग केवळ दुर्घटना घडल्यानंतरच तात्पुरती कारवाई करत असल्याचा आरोप श्री.मुळे यांनी निवेदनाद्वारे केला आहे.

# अतिक्रमण करुन उभारण्यात आलेली धार्मिक स्थळे हटविणार

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील रहदारीस अडथळा ठरणाऱ्या धार्मिक स्थळांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. शहरातील रस्ते, रस्त्याच्या कडेला आणि पदपथांलगत असलेल्या धार्मिक स्थळांचे अतिक्रमण सबंधितांनी स्वतःहून काढून घ्यावे, अन्यथा महापालिकेकडून नोटिस बजावल्यानंतर पुढील ७ दिवसात कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेच्यावतीने देण्यात आला आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर, पदपथांवर धार्मिक स्थळांचे अतिक्रमण असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले आहे. या

## महानगरपालिकेने बजावल्या नोटिसा; सात दिवसांचा अल्टिमेटम

पथपदावरुन व किंवा रस्त्यावर मार्गक्रमण करताना हे अतिक्रमण नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांसाठी धोकादायक ठरत आहे. शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या विचारात घेता, सार्वजनिक रस्त्यांवर असलेले हे अतिक्रमण या अडथळ्यांमुळे गंभीर समस्या उद्‌भवत असल्याने महापालिकेने ही कठोर पावले उचलली आहेत. वाहतुकीला अडथळा ठरत असलेली मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, दर्गा, मजार आणि कब्र यांसारख्या धार्मिक वास्तूंमुळे वाहतुकीला मोठी अडचण निर्माण होत आहे. यासंदर्भात महापालिकेकडून एक जाहीर नोटीस जारी करण्यात आली आहे. महानगरपालिकेने संबंधित धार्मिक संस्था, मंदिर ट्रस्ट आणि व्यवस्थापनांना ही अतिक्रमणे स्वतःहून हटवण्याचे किंवा स्थलांतरित करण्याचे आवाहन केले आहे. जर दिलेल्या मुदतीत अतिक्रमित धार्मिक स्थळे हटवण्यात आली नाहीत, तर त्यांना बेकायदेशीर किंवा अतिक्रमित समजून महापालिकेकडून पुढील कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.



पाईपलाईन रोड परिसरात महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने भाजीविक्रेत्यांवर कारवाई केली. (वृत्त पान २ वर)

CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

पगडी रसम

स्व. रत्नादेवी आहुजा
सभी को सुचित करते है कि, श्रीमती रत्नादेवी मुरलीधर आहुजा इनका शनिवार ता. ११/०७/२०२६ को स्वर्गवास हुआ है ।
* पगडी रसम *
मंगलवार ता. १४/०७/२०२६ को,
समय : शाम ५ से ५.३० बजे तक,
स्थान : कृपाल आश्रम, मिस्कीन रोड, अहिल्यानगर
- शोकाकूल -
प्रदिप (बेटा) पुरुषोत्तम (बेटा)
समस्त आहुजा परिवार तथा रिश्तेदार
फर्म : सुनिता ड्रेसेस, मोचीगल्ली, अ.नगर, मो : ९८९०८११४९१

४९ वे पुण्यस्मरण

स्व. भाऊ तथा किसनसिंग गोविंदसिंग परदेशी
स्व.दि.१३/७/१९७७ (तिथीनुसार १६ जुलै)
“आपल्या संस्काररूपी स्मृतींचा.. स्मृतीगंध आजही दरवळत आहे.. प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..”
- व्यक्तिगत सत्याग्रहातील पहिले स्वातंत्र्यसैनिक
- कॉंग्रेसप्रणित किसान सभेचे महाराष्ट्र सरचिटणीस
- जिल्हा दूध संघाचे संस्थापक चेअरमन (सन १९५८–७०)
- नगर–पारनेर तालुका मार्केट कमिटी संस्थापक चेअरमन
- प्रसिद्ध पहिलवान (लाहोर चॅम्पियन– सन १९३६)
- नगराध्यक्ष (सन १९५२–५४) – तीनदा तुरुंगवास
- मौजे बोल्हेगावचे (आदर्श) संस्थापक
- ग्राहक जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारचे संस्थापक, संचालक व व्हाईस चेअरमन, स्थापना १९६२–१९७७
आपल्या पुण्यस्मरणदिनी आमची भावपूर्ण श्रध्दांजली!
- दुःखांकित -
विजयसिंग किसनसिंग परदेशी
प्रतापसिंग विजयसिंग परेदशी
रणजितसिंग विजयसिंग परदेशी
यशवंत जयसिंग परदेशी
समस्त परदेशी (राजपूत) परिवार

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप–फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रॅंडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पोलीस ठाण्यातच आरडाओरड व एकमेकांना मारहाण करत दोन तरूणांचा धिंगाणा

नगर – शहरातील कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलेल्या दोन तरूणांनी १२ जुलै रोजी पहाटे पोलीस ठाण्याच्या आवारातच गोंधळ घालत एकमेकांशी झोंबाझोंबी व मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे काही काळ पोलीस ठाण्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणी दोघांविरूध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस अंमलदार रामनाथ हंडाळ यांनी फिर्याद दिली आहे. गणेश संजय भंडारी (वय २६, रा. बुरूडगाव रोड, भोसले आखाडा) व मयुर चंद्रकांत कांडेकर (वय २४, रा. अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. अंमलदार हंडाळ इतर सहकार्यांसोबत रात्र ड्यूटीवर होते. पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास जखमी अवस्थेतील अक्षय कांडेकर (रा. सारसनगर) हा तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आला. पोलिसांनी त्याची माहिती घेऊन उपचारासाठी वैद्यकीय मेमो दिला. त्यानंतर आणखी दोन तरूण पोलीस ठाण्यात आले आणि त्यांनी मोठ्याने आरडाओरड केला.

ड्युटीवरील पोलिसांनी त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. मात्र त्यांनी पोलिसांचे कोणतेही न ऐकता एकमेकांशी झोंबाझोंबी करत मारहाण सुरू केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी हस्तक्षेप केला. नाईट ऑफिसर सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांनीही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी पोलिसांशीही हुज्जत घालत गोंधळ सुरूच ठेवला. अखेर पोलिसांनी दोघांना शांत करून त्यांची चौकशी केली असता त्यांची नावे गणेश संजय भंडारी आणि मयुर चंद्रकांत कांडेकर असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# आयटी कंपनीत पहाटे चोरीचा प्रयत्न, गॅलरीतून उडी मारून पळ काढण्याच्या प्रयत्नात चोरटा जखमी

नगर – शहरातील पाईपलाईन रोडवरील एका आयटी कंपनीत १२ जुलै रोजी पहाटे २ च्या सुमारास कुलूप तोडून आत शिरलेल्या आणि चोरीचा प्रयत्न करणाऱ्या एका चोरट्याला नागरिकांनी पकडून तोफखाना पोलिसांच्या ताब्यात दिले. चोरी केल्यानंतर गॅलरीतून उडी मारून पळ काढण्याच्या प्रयत्नात हा चोरटा जखमी झाला असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अभिषेक भाऊसाहेब शिंदे (वय २१ वर्ष, रा. वांबोरी, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची पाईपलाईन रोडवरील वाणी नगर कमानजवळ असलेल्या 'वाणी हाईट्स' इमारतीच्या ५ व्या मजल्यावर 'इग्नकोड सोल्यूशन प्रा. लि.' ही आयटी कंपनी व ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आहे. १२ जुलै रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास आरोपी कृष्णा आल्हाट (रा. श्रमिकनगर, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) याने या इन्स्टिट्यूटच्या फ्लॅट क्र. ६०२ च्या दरवाजाचे कुलूप तोडले. त्याने आत प्रवेश करून ऑफिसमधील टीव्ही, खुर्च्या, बेंच व इतर साहित्याचे मोठे नुकसान केले. त्यानंतर ऑफिसमधील होम थिएटर, की-बोर्ड्स, वॉटर हिटर व छोटी इलेक्ट्रॉनिक उपकरणे एका कपड्यात बांधून गॅलरीतून खाली टाकून दिली.

चोरीचा हा माल गोळा करून पळून जाण्यासाठी आरोपीने स्वतः ऑफिसच्या गॅलरीमधून खाली असलेल्या पत्र्यांच्या शेडवर उडी मारली. या उडीमुळे तो जखमी झाला. गॅलरीतून उडी मारून पळून गेलेला हा आरोपी जवळच असलेल्या एका बंद पडलेल्या शाळेच्या खोलीमध्ये अंधारात ऑफिसच्या चोरी केलेल्या साहित्यासह लपून बसला. चोरीची ही घटना परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी तात्काळ धाव घेतली. अंधारात लपून बसलेल्या चोरट्याला नागरिकांनी पकडून ठेवत पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले.

याप्रकरणी अभिषेक शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी कृष्णा आल्हाट याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६२, ३३१(४), १२५(अ), ३२४(२) प्रमाणे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तोफखाना पोलीस स्टेशनचे पो.नि. बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पो. ना. जिजाबाई खुडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## अरविंद साळुंके यांचे हृदयविकाराने निधन

नगर – वांबोरी येथील रहिवासी अरविंद श्रीकांत साळुंके (वय ५५) यांचे १३ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १३ जुलै रोजी रात्री अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वारी चालत असताना दिंडीमध्ये नामघोष करीत असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता.



## शहबाज मणियार यांचे हृदयविकाराने निधन



नगर – माळीवाडा येथील रहिवासी शहबाज लतीफ मणियार (वय ३७) यांचे १३ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी काटवन खंडोबा रोड वरील जंगी शहदा कब्रस्तान येथे करण्यात आला. त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## विष्णु आडेप यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बागडपट्टी, आकडेवाडा येथील रहिवासी विष्णू मारुती आडेप (वय ६०) यांचे ११ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शामलाबाई आडेप यांचे पती तर भारत आडेप यांचे ते वडील होत.

## साहेबराव खैरे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील साहेबराव बबनराव खैरे (वय ८८) यांचे १२ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १३ जुलै रोजी मल्हार चौकातील रेल्वे स्टेशन स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ६ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगरसेवक दीपक खैर यांचे ते वडील होत.

## मनिषाबाई दळवी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – गौरीघुमट, आनंदीबाजार येथील रहिवासी मनिषाबाई दळवी (वय ४८) यांचे ११ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १२ जुलै रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुली, १ मुलगा, पती, सासु, सासरे असा परिवार आहे. राजू (आप्पा) दळवी यांच्या त्या पत्नी तर श्लोक दळवी यांच्या मातोश्री होत.



## विजयाबाई श्रीपत यांचे हृदयविकाराने निधन

नगर – तोफखाना येथील रहिवासी श्रीमती विजयाबाई बाळकृष्ण श्रीपत (वय ७५) यांचे ११ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १२ जुलै रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सविता दिपक कुरी यांच्या त्या मातोश्री होत.



## रत्नादेवी आहुजा यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – साधू वासवानी सोसायटी, सावेडी येथील रत्नादेवी मुरलीधर आहुजा (वय ८७) यांचे ११ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथील विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या ईच्छेनुसार त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, २ विवाहित मुली, जावई असा परिवार आहे. मोचीगल्ली येथील सुनीता ड्रेसेस फर्मचे संचालक प्रदीप व पुरुषोत्तम आहुजा यांच्या त्या मातोश्री होत.



## रायचंद बागमार यांचे संथारा व्रतात निधन

नगर – अरणगाव (ता. नगर) येथील व्यावसायिक रायचंद कचरदास बागमार (वय ८५) यांचे संथारा व्रतात निधन झाले. त्यांची मुलगी दीपाली मंडलेचा यांनी त्यांना सागरी संथारा दिला होता. त्यात त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्यामागे दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अहिल्यानगर शहरातील वैदूवाडी (सावेडी) परिसरातील हसमुख सुपर मार्केटचे संचालक संतोष बागमार व अरणगाव येथील संगीता प्रोव्हीजनचे संचालक सचिन बागमार यांचे ते वडील होत. त्यांचे मूळ गाव खळेगाव (जि. बीड) आहे. ५० वर्षांपूर्वी त्यांनी अरणगावला किराणा दुकान सुरू केले.



# व्यावसायिकाला बेदम मारहाण करून रोकड व मोबाईल लुटला, गुन्हा दाखल

नगर – दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून व्यावसायिकाला मारहाण करून त्यांच्याकडील ५० हजार रूपयांची रोकड तसेच त्याच्या भावाचा मोबाईल हिसकावून नेल्याची घटना १२ जुलै रोजी पहाटे शहरातील स्वस्तिक बसस्थानकासमोरील बाबा ट्रान्सपोर्टजवळ घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तिघाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय चंद्रकांत कांडेकर (वय ३१. रा. सारसनगर) यांनी फिर्याद दिली आहे. अविनाश विश्वास जायभाय, गणेश घुले (दोघे रा. केडगाव) आणि शुभम हराळ (रा. सारसनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. फिर्यादी अक्षय कांडेकर यांचे यापूर्वी संशयित आरोपींसोबत किरकोळ कारणावरून वाद झाले होते. १२ जुलै पहाटे एक वाजण्याच्या सुमारास अक्षय आणि त्यांचा भाऊ मयूर कांडेकर हे पुणे बसस्थानकासमोरील बाबा ट्रान्सपोर्ट शेजारी असलेल्या अंडाभुर्जीच्या गाडीवर गेले होते. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या आरोपींनी दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. मात्र, माझ्याकडे पैसे नाहीत, असे सांगून कांडेकर यांनी नकार दिला. याचा राग आल्याने तिघांनी त्यांच्याशी हुज्जत घालत मारहाण केली.

मारहाणी दरम्यान अक्षय यांच्या खिशातील ५० हजार रूपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली, तसेच तुला खूप माज आला आहे. तुला पाहू घेतो, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या भाऊ मयूर कांडेकर यांच्याकडील मोबाईलही आरोपींनी हिसकावून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# दारूच्या नशेत कंपनीत गेलेल्या दोघांकडून इंजिनिअरला मारहाण

नगर – अरणगाव रोडवर असलेल्या कायनेटीक कंपनीत एका ट्रेनी इंजिनिअरला दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून कंपनीच्याच माजी कर्मचाऱ्यांनी चापटीने मारहाण करत शिवीगाळ व दमदाटी केल्याची घटना १२ जुलै रोजी दुपारी ३.३५ च्या सुमारास घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुफियान अल्लाबक्ष इनामदार (वय २६, रा. म्हाडा बिल्डींग, नोबेल हॉस्पीटल जवळ, प्रेमदान चौक, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुफियान हे कायनेटीक कंपनी, अरणगाव रोड, अहिल्यानगर येथे ट्रेनी इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. तर आरोपी राहुल खंडागळे व यश सोनवणे (दोघे रा. कायनेटीक चौक, अहिल्यानगर) हे देखील याच कंपनीत काम करत होते, मात्र त्यांनी जून २०२६ मध्ये काम सोडले होते.

१२ जुलै रोजी दुपारी ३.३५ च्या सुमारास, दोन्ही आरोपी हे दारूच्या नशेत आपला जुना पगार घेण्यासाठी कंपनीत आले होते. तेथे त्यांची ओळख असलेल्या सुफियान यांच्याकडे आरोपींनी दारू पिण्यासाठी २०० रुपयांची मागणी केली. मात्र, सुफियान यांनी आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगितले. याचाच राग मनात धरून आरोपींनी सुफियान यांना चापटीने मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच तू आम्हाला पैसे दिले नाही, तुझ्याकडे पाहून घेतो अशी धमकी देत शिवीगाळ व दमदाटी केली. या घटनेनंतर सुफियान इनामदार यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी राहुल खंडागळे आणि यश सोनवणे यांच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२ आणि ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक दिपक मेढे करत आहेत.

# महापुरुषांच्या जयंतीवरुन जातीय शिवीगाळ करत तरूणाला मारहाण

नगर – महापुरुषांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर जातीय अवमानकारक वक्तव्य करून एका तरूणाला शिवीगाळ केल्याप्रकरणी तसेच त्याच्या भावाला मारहाण करून दुचाकीचे नुकसान केल्याप्रकरणी शहरातील सर्जेपुरा परिसरातील एका व्यक्तीविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटी व अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विशाल यशवंत साळवे (वय ३३. रा. हरिजन वस्ती, रंगभवन, सर्जेपुरा) यांनी १२ जुलै रोजी फिर्याद दिली आहे. सद्दाम शेख (रा. व्हिनसेनपुरा, सर्जेपुरा) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. साळवे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते ११ जुलै रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास किराणा साहित्य आणण्यासाठी दुचाकीवरून रंगभवन, सर्जेपुरा परिसरातून जात होते. यावेळी त्यांची ओळख असलेला सद्दाम शेख याने त्यांना थांबवून कोणतेही कारण नसताना शिवीगाळ केली. तसेच आता महापुरुषांची जयंती आलेली आहे, तुम्हाला सिडी लावायला पैसे देऊ का? देऊ का तुम्हाला ५० रुपये, अशा शब्दांत शेख याने जातीय अवमानकारक वक्तव्य करून त्यांचा अपमान केला.

साळवे यांनी जातीयवाचक शब्द बोलू नको, अशी समज दिल्यानंतर शेख याने पुन्हा वाद घातला. त्यानंतर त्याने फिर्यादीच्या मोपेडला लाथ मारून खाली पाडत नुकसान केले. हा वाद सुरू असताना फिर्यादीचा भाऊ हर्षद साळवे हा भांडण सोडविण्यासाठी आला. त्यावेळी त्याला ही सद्दाम शेख याने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी सद्दाम शेख याच्या विरुद्ध अ‍ॅट्रॉसिटी व अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.



श्रीरामपूरातील गुंडशाहीविरोधात व्यापारी, सामाजिक संघटना आणि सर्वपक्षीय नेत्यांनी पुकारलेल्या 'बेमुदत बंद'ला सलग दुसऱ्या दिवशीही १३ जुलै रोजी प्रतिसाद मिळाला आहे.

# अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील पुन्हा १५ अधिकाऱ्यांच्या बदल्या

नगर – जिल्हा पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक, दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि १२ पोलीस उपनिरीक्षक अशा एकूण १५ पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी याबाबतचे आदेश जारी केले. बदली झालेल्या सर्व अधिकार्यांनी कोणताही पदग्रहण अवधी न घेता तात्काळ नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आदेशानुसार, पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांची नियंत्रण कक्षातून जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. नुकतीच राहुरी पोलीस ठाण्यात बदली झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांची पुन्हा बदली करण्यात आली असून, त्यांच्याकडे अप्पर पोलीस अधीक्षक यांचे वाचक म्हणून पदभार सोपविण्यात आला आहे. तसेच, तोफखाना पोलीस ठाण्यातून यापूर्वी पाथर्डी येथे बदली झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटला यांची राहुरी पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे.

बदली झालेल्या पोलीस उपनिरीक्षकांची नियुक्ती पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे. गजेंद्र इंगळे (नगर तालुका), अजय कौटे (एमआयडीसी), समाधान फडोळे (अकोले), संदीप शिंदे (नेवासा), रसुल शेख (श्रीगोंदा), आजिनाथ बटुळे (कर्जत), परसराम तागड (राजूर), हर्षवर्धन बहिर (श्रीरामपूर शहर), किरण जगदाळे (मिरजगाव), विजयकुमार कोठावळे (बेलवंडी), किरण शेलार (वाहतूक शाखा, शिर्डी) आणि अशोक खेडकर (खर्डा).

# देऊळगाव सिद्धी येथे जुन्या वादातून दोन कुटुंबांत तुफान हाणामारी

**दोन्ही बाजूंच्या परस्परविरोधी तक्रारींवरून १४ ते १५ जणांवर गुन्हे दाखल**

नगर – नगर तालुक्यातील देऊळगाव सिद्धी येथे जुन्या वादावरून आणि मेडिकलच्या उधारीच्या कारणावरून दोन कुटुंबांमध्ये लोखंडी रॉड, लाकडी काठ्या आणि गजाने तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या हाणामारीत दोन्ही बाजूंचे महिलांसह अनेक जण जखमी झाले असून, दोन्ही गटांनी दिलेल्या परस्परविरोधी फिर्यादीवरून नगर तालुका पोलिस ठाण्यात १४ ते १५ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पहिल्या घटनेत, मुक्ताबाई मच्छिंद्र चितळकर (वय ३२, रा. देऊळगाव सिद्धी, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १२ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास त्या त्यांच्या घरासमोर उभ्या असताना आरोपी शिवाजी लक्ष्मण इंगळे, किरण शिवाजी इंगळे, अक्षय दिलीप इंगळे, दिलीप लक्ष्मण इंगळे, मंदा शिवाजी इंगळे, मनिषा दिलीप इंगळे, जया किरण इंगळे व इतर दोघांनी त्यांना घेरले. आरोपींनी तू आमच्यावर मागचे वर्षी केस केली आहे, ती मागे घे नाहीतर जिवंत सोडणार नाही असे म्हणत शिवीगाळ सुरू केली.

फिर्यादीने केस मागे घेण्यास नकार दिल्याने आरोपींनी त्यांना कानाखाली मारली. मुक्ताबाईंचा ओरडण्याचा आवाज ऐकून त्यांचे पती, चुलत सासरे आणि दीर सचिन हे सोडवा-सोडव करण्यासाठी आले असता, आरोपींनी त्यांच्यावर चाकू, लोखंडी रॉड आणि लाकडी काठीने हल्ला केला. यात फिर्यादीचे पती व सासरे गंभीर जखमी झाले असून, हाणामारीत पतीच्या गळ्यातील सोन्याची चेन तुटून गहाळ झाली आहे. आरोपींनी केस मागे घ्या, नाहीतर गोळ्या घालून मारून टाकू अशी धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

तर दुसऱ्या बाजूने, शिवाजी लक्ष्मण इंगळे (वय ५५, रा. देऊळगाव सिद्धी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार, फिर्यादी यांच्या मुलाने आरोपी मुक्ताबाई चितळकर यांच्या मेडिकलमधून ६०० रुपयांचे साहित्य उधारीवर आणले होते. याच उधारीच्या कारणावरून वाद होऊन आरोपी सचिन लक्ष्मण चितळकर, मच्छिंद्रनाथ लक्ष्मण चितळकर, भाऊसाहेब नारायण चितळकर, मुक्ताबाई मच्छिंद्र चितळकर, सुवर्णा सचिन चितळकर, सारीका गोरक्ष चितळकर आणि गोरक्ष मंजाबापु चितळकर यांनी बेकायदेशीर मंडळी जमवून फिर्यादी यांच्या कुटुंबावर हल्ला केला.

आरोपी सचिनने लाकडी काठीने फिर्यादीच्या पाठीवर व खांद्यावर मारहाण केली, तर मच्छिंद्रनाथने लोखंडी गजाने फिर्यादीच्या कपाळावर मारून गंभीर जखमी केले. यावेळी सोडवण्यासाठी आलेल्या फिर्यादीचा मुलगा किरण आणि पत्नी मंदाकिनी यांनाही आरोपींनी लाकडी काठीने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत आमच्या नादी लागले तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली.या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या दोन्ही गुन्ह्यांचा तपास स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. शिवाजी माने व पो.हे.कॉ. खेडकर हे करत आहेत.

# दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पो चालकाचा मृत्यू

**एमआयडीसी जवळील सनफार्मा चौकात झाला भीषण अपघात**

नगर – राँग साईडने भरधाव वेगात आलेल्या दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पो नवीन उड्डाणपुलाच्या कॉलमला जाऊन जोरात धडकल्याने चालकाचा मृत्यू झाल्याची घटना ११ जुलै रोजी पहाटे एमआयडीसीतील सनफार्मा चौकात घडली. इरफान अन्वर शेख (वय ५५, रा.करडे, ता. शिरूर, जि. पुणे) असे मयत टेम्पो चालकाचे नाव आहे.

याबाबत त्यांचा मुलगा शोएब शेख यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मयत इरफान शेख हे ११ जुलै रोजी पहाटे त्यांचा टेम्पो घेवून एमआयडीसी कडे जात असताना सनफार्मा चौकात अचानक एकाने त्याच्या ताब्यातील दुचाकी अत्यंत हयगयीने आणि भरधाव वेगात चालवून रस्त्याच्या चुकीच्या बाजूने आणले. समोरून भरधाव वेगात येणाऱ्या या दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पो चालकाने आपले वाहन बाजूला घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

मात्र, दुर्दैवाने ताबा सुटल्यामुळे हा टेम्पो रस्त्याशेजारी असलेल्या नवीन पुलाच्या कॉलमला जाऊन जोरात धडकला. या भीषण धडकेत टेम्पो चालकाला गंभीर दुखापत झाली आणि त्यामध्येच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# रस्त्याकडेला बसणाऱ्या भाजीविक्रेत्यांवर महानगरपालिकेची कारवाई; पाईपलाईन रोड, गाडगीळ पटांगण परिसरातील भाजीवाल्यांना हटवले

नगर – शहरातील रस्त्यांच्या कडेला पथारी मांडून भाजीविक्री करणाऱ्यांमुळे वाहतुकीला अडथळा ठरत असल्याच्या तक्रारी महापालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करून संबंधित भाजीविक्रेते, टपऱ्या यांचे साहित्य जप्त करीत त्यांच्यावर कारवाई केली.



पाईपलाईन रोड परिसरात महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने भाजीविक्रेत्यांवर कारवाई केली.

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार, अहिल्यानगर महापालिकेची शहरातील अनधिकृत अतिक्रमणांविरुद्धची मोहीम सुरूच आहे. सोमवारी महापालिकेच्या पथकाने पाईपलाईन रोडवरील एकविरा चौक व शहरातील गाडगीळ पटांगण येथे ही कारवाईची माहिती राबविली. या कारवाईमुळे रस्त्याकडेला बसलेले अतिक्रमित भाजी विक्रेत्यांवर ही कारवाई करण्यात आली. यामुळे पाईपलाईन रोडवरील वाहतुकीचा अडथळा दूर झाला आहे.

महापालिकेच्या सावेडी आणि शहर प्रभाग समितीच्या पथकांनी ही कारवाई केली. यात पाईपलाईन रोडवरील एकविरा चौक परिसरात रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या फळ आणि भाजीपाला विक्रेत्यांवर कारवाई करत रस्ते वाहतुकीसाठी मोकळे करण्यात आले. तसेच, गाडगीळ पटांगण परिसरात रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांचे अतिक्रमणही महापालिकेच्या पथकाने हटवले. ही कारवाई अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये उपअभियंता सुरेश इथापे, प्रभाग अधिकारी गणेश वाकळे, क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे, देविदास बिजा आणि राहुल साबळे यांच्यासह अतिक्रमण पथकाने सहभाग घेतला.

# गृहिणी

## आरोग्य

### आले : गुणांनी श्रीमंत कंदमूळ

आले ठरेल 'सुपरफूड' आले हे स्वयंपाक घरातील साधे दिसणारे पण गुणांनी श्रीमंत कंदमूळ आहे. प्राचीन आयुर्वेदापासून याला 'महाऔषध' मानले जाते आणि आता आधुनिक विज्ञानानेही याला 'सुपरफूड'चा दर्जा दिला आहे. आले जिंजेरॉल, शोगोल, झिंक, मॅग्नेशियम आणि शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. यातील खास 'जिंजेरॉल' नावाचे संयुग पचनक्रिया सुधारते, शरीरातील सूज कमी करते आणि वेदना शमवण्यास मदत करते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आले रामबाण आहे कारण रोज थोडे आले खाल्ल्याने सर्दी-खोकल्यापासून बचाव होतो. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे कंदमूळ उत्तम आहे, कारण यामुळे चयापचय क्रिया जलद होते आणि भूक नियंत्रणात राहते. आल्यामुळे रक्ताभिसरण सुधारते तर अँटिऑक्सिडंट्स हृदयविकार व मधुमेहासारख्या आजारांपासून बचाव करतात. हिवाळ्यात शरीर गरम ठेवण्यासाठी, मळमळ कमी करण्यासाठी आणि सांधेदुखीवरही आल्याचा उपयोग होतो. आयुर्वेदात आल्याला वात-कफशामक व पाचक मानले आहे. तिखट-उग्र चवीमुळे ते चहा, काढा, लोणचे, भाजी अशा अनेक प्रकारे वापरले जाते. महागड्या विदेशी सुपरफूड्सपेक्षा आले सहज, स्वस्त आणि आपल्या मातीतले असल्याने अधिक गुणकारी ठरते.

## पाककला

### चॉकलेट पान बर्फी

**साहित्य :** खवा १ वाटी, मिल्क पावडर १/२ वाटी, साखर ३/४ वाटी, तूप २ चमचे, पानाचे पत्ते ५, गुलकंद ३ चमचे, बडीशेप १ चमचा, वेलची पूड १/४ चमचा, हिरवा खाद्य रंग २ थेंब, बारीक चिरलेला सुका मेवा २ चमचे, चांदीचा वर्ख सजावटीसाठी

**कृती :** पानाचे पत्ते धुवून देठ काढून मिक्सरमध्ये २ चमचे पाणी घालून बारीक वाटून घ्या. गाळून हिरवा रस बाजूला ठेवा. कढईत १ चमचा तूप गरम करून खवा मध्यम आचेवर ३ मिनिटे परतून घ्या. त्यात मिल्क पावडर आणि साखर घालून मिश्रण एकजीव करा. साखर विरघळून मिश्रण घट्ट होऊ लागल्यावर पानाचा रस, वेलची पूड आणि हिरवा रंग घाला. सतत ढवळत राहा. मिश्रण कढईच्या कडा सोडू लागले की गॅस बंद करा. ताटलीला तूप लावून मिश्रण ओता आणि समान पसरवा. थोडे गार झाल्यावर वर गुलकंद पातळ थर देऊन पसरा. त्यावर भाजलेली बडीशेप आणि सुका मेवा पेरा. हलक्या हाताने दाबून सेट होऊ द्या. पूर्ण गार झाल्यावर चांदीचा वर्ख लावा आणि चौकोनी वड्या कापा. तयार बर्फीचे तुकडे करून थंड सर्व्ह करा.

## वास्तू

### मोठे झाड

* वड, पिंपळ, उंबर यासारखी चिक किंवा दूध येणारी झाडे घराच्या अगदी जवळ लावू नका. यामुळे संतानसंबंधी अडचणी येतात असे वास्तुशास्त्र सांगते. मंदिर किंवा शेतात लावावीत.

* घराच्या परिसरात कोणतेही झाड सुकले, जळाले किंवा वाळले असेल तर त्वरित काढून टाका. सुकलेले झाड नकारात्मक ऊर्जेचे प्रतीक आहे. घरात अशुभ घटना घडतात.

* कोणत्याही झाडाची फांदी घराच्या छतावर किंवा भिंतीला टेकली असेल तर ती छाटून टाका. याला 'शाखा वेध' म्हणतात. घरातील सदस्यांच्या डोक्यावर सतत दडपण राहते. वाढू दिल्यास घराचे नुकसान होते आणि आर्थिक अडचणी येतात.

## सौंदर्य

* २ चमचे कोमट खोबरेल तेलात चिमूटभर कापूर पावडर मिसळा. रोज रात्री झोपण्यापूर्वी स्ट्रेच मार्क्सवर १० मिनिटे गोलाकार मसाज करा. त्वचा मऊ होते आणि मार्क्स हळूहळू फिकट होतात.

* ताजा कोरफडीचा गर काढून थेट मार्क्सवर लावा. २० मिनिटे ठेवून कोमट पाण्याने धुवा. कोरफडीतील कोलेजन त्वचा दुरुस्त करते. दिवसातून २ वेळा करा, ३ महिने करा.

## सल्ला

भाजी शिजत असताना ओटा पुसून घ्या. वापरलेली भांडी लगेच सिंकमध्ये घासायला टाका. स्वयंपाक झाला की किचनही आवरलेले असते. शेवटी कंटाळा येत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. १४ जुलै २०२६**

**दर्श अमावास्या, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, पुनर्वसु २४।१०, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** बदल घडतील, धनलाभ होईल, कामे पूर्ण होतील.

**वृषभ :** नवीन जबाबदारी मिळेल, जुनी गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**मिथुन :** व्यापारात प्रगती होईल, प्रवासाचे योग येतील.

**कर्क :** सहकार्य लाभेल, मानसिक शांतता आणि आर्थिक बळ मिळेल.

**सिंह :** प्रशंसा होईल, जुने वाद मिटतील, प्रवास घडेल.

**कन्या :** व्यापारात नफा होईल, कौटुंबिक सुख लाभेल.

**तूळ :** पदोन्नतीचे संकेत मिळतील, आर्थिक अडचणी दूर होतील.

**वृश्चिक :** रखडलेली कामे मार्गी लागतील, मान-सन्मान वाढेल.


**धनु :** नवे उपक्रम सुरू होतील, प्रकृती उत्तम राहील.

**मकर :** नवीन ग्राहक मिळतील, अडकलेले धन प्राप्त होईल.

**कुंभ :** मोठे यश हाती येईल, ज्येष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन :** रोजगाराची संधी मिळेल, वास्तूचे व्यवहार पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७४७२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अमुक; फलाणा ४) एकाएकी; अकस्मात ६) लोकांची मोजदाद; शिरगणती; खानेसुमारी ७) शेत; वन; जंगल; वावर ८) भाजणीचा भाकरीसारखा केलेला एक रुचकर खाद्यपदार्थ १०) रुपे; चांदी १२) समाधी; थडगे; कबर १६) मारणारे; हानिकारक १८) अधिक चांगला; श्रेष्ठ २०) परीक्षा; चाचणी २१) तीनशेपासून हजारपर्यंत पायदळाची तुकडी २२) एक विषम संख्या

**उभे शब्द :-** १) ज्याला म्हातारपण व मृत्यू नाही असा २) चिंतन; ध्यान ३) एक पक्षी; वायस; कावळा; काक ४) जेथे अनाथ लोकांची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय केली जाते ते ठिकाण ५) एक फळ ९) लग्नात अक्षता टाकताना वधुवराच्या मध्ये धरतात ते कापड ११) गोळा झालेले; आय; संकलित १३) परीक्षा; चाचणी; सत्त्व १४) यशस्विता; भरभराट १५) ढीग; चळत; चवड १७) पंचांगातील एक भाग; अर्धी तिथी १९) अधर्म; पातक

### शब्दगंध क्र. ७४७१ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** इतकेही नम्र बनू नका की लोक तुम्हाला पायपुसणी समजतील, नम्रतेतही एक रुबाब असावा!

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आई-वडिलांचे कोणते गुण रेणुसूत्रांमुळे मुलांमध्ये येतात? स्वभाव पण ठरतो का?

प्रत्येक मुलाच्या मनात एकदा तरी हा प्रश्न येतोच की, मी आईसारखा दिसतो की बाबांसारखा? माझा रागीट स्वभाव वडिलांकडून आला का? याचं उत्तर आपल्या शरीरातल्या रेणुसूत्रांमध्ये लपलेलं आहे. रेणुसूत्र म्हणजे आपल्या शरीराचा 'संकेत' किंवा 'नकाशा' असतो. आईकडून अर्धे आणि वडिलांकडून अर्धे रेणुसूत्र मिळून आपला 'नवा संकेत' तयार होतो. त्यामुळेच आपण आपल्या आई-वडिलांचे मिश्रण असतो, पण त्यांची तंतोतंत प्रत नसतो. सर्वात आधी आपण दिसण्याबद्दल बोलू. उंची, डोळ्यांचा रंग, केसांचा प्रकार, नाकाचा आकार, कानांची ठेवण हे जवळपास ऐंशी ते नव्वद टक्के रेणुसूत्रांवरून ठरते. म्हणूनच आई-वडील दोघेही उंच असतील तर मुलंही उंच निघण्याची शक्यता जास्त असते. पण फक्त रेणुसूत्र असून भागत नाही. लहानपणी सकस आहार मिळाला नाही, तर उंचीचे गुणसूत्र असूनही मूल उंच होत नाही. म्हणजेच रेणुसूत्राने 'पाया' घातला, पण 'इमारत' किती उंच होणार हे खाण्या-पिण्यावर अवलंबून आहे. डोळ्यांचा रंग, कुरळे केस मात्र जवळपास पूर्णपणे रेणुसूत्र ठरवतो, यात वातावरणाचा फारसा वाटा नसतो. आता सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे स्वभाव. माझा स्वभाव बाबांसारखा रागीट आहे असं आपण अनेकदा ऐकतो. शास्त्र सांगतं की हो, स्वभावाचा चाळीस ते साठ टक्के भाग रेणुसूत्रांवरून येऊ शकतो. मूल जन्मल्यापासूनच शांत आहे की चिडचिडं, मित्र आहे की धाडसी, लोकांत मिसळणारं आहे की एकटं राहणारं, याची बीजे रेणुसूत्रांमध्ये असतात. यालाच 'मूळ प्रवृत्ती' म्हणतात.

बुद्ध्यांक सुद्धा पन्नास ते ऐंशी टक्के अनुवांशिक असतो. काही लोकांच्या मेंदूत आनंद देणारी रसायने जास्त वेगाने काम करतात, त्यामुळे ते जन्मतःच हसरे असतात. तर काही लोकांमध्ये रागाची भावना लवकर जागृत होते. नैराश्य, अतिचंचलता यांसारख्या गोष्टींची शक्यता सुद्धा घरात कोणाला असेल तर रेणुसूत्रांमुळे वाढते.पण याचा अर्थ असा नाही की वडील रागीट आहेत म्हणून मुलगा रागीटच निघणार. इथेच 'संगोपन' म्हणजे वातावरणाचा खेळ सुरू होतो. रेणुसूत्र फक्त तुम्हाला एक 'कक्षा' देतो. समजा तुमच्या रेणुसूत्रात रागीटपणाचे गुण आहेत. आता जर घरात लहानपणापासून भांडण, आरडाओरडा होत असेल, तर ते गुण 'जागे' होतात आणि मूल रागीट बनते. पण तेच मूल जर शांत, प्रेमळ वातावरणात वाढलं, त्याला रागावर नियंत्रण ठेवायला शिकवलं, तर तेच गुण 'झोपून' राहतात. मूल शांत स्वभावाचं होतं. यालाच शास्त्रज्ञ 'जनुक-बाह्य शास्त्र' म्हणतात. रेणुसूत्र ही बंदूक आहे, पण तिचा घोडा ओढायचा की नाही हे वातावरण ठरवतं. आवड-निवड, सवयी, भाषा, उपजीविका या गोष्टी रेणुसूत्रांवर अवलंबून नसतात. तुम्ही मराठी बोलता कारण घरात मराठी बोललं जातं, रेणुसूत्रांमुळे नाही. तुम्हाला क्रिकेट आवडतं कारण वडिलांना आवडतं आणि तुम्ही लहानपणापासून तेच पाहिलं, यात गुणसूत्रांचा वाटा नाही.

म्हणूनच एकाच आई-बापाच्या दोन मुलांचे स्वभाव पूर्णपणे वेगळे निघतात. कारण दोघांना पन्नास-पन्नास टक्के रेणुसूत्र मिळतो, पण कोणता अर्धा भाग मिळाला हे वेगळं असतं. अगदी जुळी मुलं सुद्धा मोठी झाल्यावर वेगळी वागतात, कारण त्यांचे अनुभव वेगळे असतात.थोडक्यात, आई-वडिलांचे दिसणे, उंची, रंग, काही आजार यापैकी ऐंशी ते नव्वद टक्के गोष्टी रेणुसूत्रांमुळे आपल्यात येतात. पण स्वभाव, सवयी, यश-अपयश यापैकी फक्त चाळीस ते साठ टक्के रेणुसूत्र ठरवतो. बाकीचा पन्नास टक्के वाटा आपले संस्कार, शिक्षण, मित्र, अनुभव आणि स्वतःचे प्रयत्न ठरवतात. म्हणूनच रेणुसूत्राला दोष देऊन चालत नाही. रेणुसूत्राने तुम्हाला कसं बनवलं यापेक्षा तुम्ही स्वतःला कसं घडवता, याला जास्त महत्व आहे.

### प्रगतीचा समतोल

एका गावात सोहम नावाचा एक लहान मुलगा राहत होता. त्याच्या वाढदिवसाला त्याच्या वडिलांनी त्याला एक छान, नवी कोरी दुचाकी (सायकल) आणून दिली. सोहमचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्याने ठरवले की तो गावातला सगळ्यात वेगवान दुचाकीस्वार बनेल.

दुसऱ्याच दिवशी तो दुचाकी घेऊन रस्त्यावर आला. त्याने पूर्ण ताकदीने गती देण्यास सुरवात केली. दुचाकीने वेग घेतला. सोहमला खूप छान वाटत होते. वाऱ्याच्या वेगाने पुढे जाताना त्याचा आत्मविश्वास वाढला. त्याला वाटले, 'जितक्या वेगाने मी पुढे जाईन, तितका मी जगात भारी ठरेन.'

पण या वेगाच्या नादात त्याच्या एक गोष्ट लक्षात आली नाही-दुचाकी चालवण्यासाठी फक्त गती देऊन चालत नाही, तर गतीच्या दांड्यावर (हँडलवर) नियंत्रण ठेवून समतोल साधावा लागतो. अचानक रस्त्यावर एक लहान वळण आणि खड्डा आला. सोहमचा वेग खूप जास्त होता आणि त्याचे नियंत्रण सुटले होते. दुचाकी जोरात घसरली आणि सोहम रस्त्याच्या कडेला पडला. त्याला थोडी खरचटले आणि दुचाकीची साखळीही निखळली. तो रडवेल्या चेहऱ्याने तिथेच बसला. तेवढ्यात तिथून त्याचे वडील चालले होते. त्यांनी सोहमला उठवले, त्याचे कपडे झटकले आणि विचारले, काय झाले बेटा?


सोहम म्हणाला, बाबा, मी तर खूप वेगाने जात होतो, तरीही मी पडलो कसा? वडील हसले आणि दुचाकीची साखळी पुन्हा व्यवस्थित करत म्हणाले, बाळा, दुचाकी चालवण्याचा एक नियम आहे.

फक्त वेगाने पुढे जाऊन चालत नाही. डोळे समोर ठेवून, हातांवर मजबूत पकड ठेवून समतोल साधावा लागतो. जर वेग जास्त आणि समतोल शून्य असेल, तर अपघात होणारच.

सोहमला वडिलांचे बोलणे समजले. त्याने पुन्हा दुचाकीवर हात ठेवला, यावेळी वेगासोबतच त्याने आपले लक्ष समतोल राखण्यावर केंद्रित केले आणि तो सुरक्षितपणे चालवायला शिकला.

बोध : या दुचाकीप्रमाणेच आपले आयुष्यही आहे. आयुष्यात पुढे जाण्यासाठी कष्ट आणि गती जितकी महत्त्वाची आहे, तितकेच आपल्या विचारांवर, रागावर आणि स्वभावावर नियंत्रण ठेवून समतोल राखणे आवश्यक आहे. संयम आणि समतोल नसेल, तर अविचाराचा वेग आपल्याला संकटात टाकू शकतो.

## आत्मशक्ति



### प्रियजन सोबत असताना

आम्हाला असाही अनुभव आला असेल की, जेव्हा आमचे प्रियजन आमच्याबरोबर होते, तेव्हा आमची सारी दुःखे व समस्या दूर झाल्या होत्या. एकमेकांशी बोलतांना एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहतांना वाटले असेल, सारा वेळ कसा पंख लावून उडून गेला! प्रेमामध्ये आम्ही एकमेकांच्या चुका वा कमतरता विसरून जात होतो.

आयुष्यात आई-वडिल बनून आम्ही अशाच एका दुसऱ्या प्रेमाचा अनुभव घेतला असेल, आमच्या बाळाला छातीशी कवटाळीत, त्याच्या डोळ्यात भरभरून पहातांना आम्हाला कितीतरी आनंद झाला असेल.

त्याची इवलीशी बोटे पकडून चालतांना, असा काही उत्साह आला असेल की त्याचे वर्णनही न करता यावे ! ह्यावरून असे स्पष्ट दिसते की आमचे आई-वडिल आमच्यावर किती प्रेम करत असतील; आम्ही आपल्या मुलांना उत्तम अन्न, कपडे आणि खेळणी देण्यासाठी कशाचाही त्याग करायला तयार असतो.

बाह्य जगातील हे सारे प्रेम, आमच्या अंतरीय महान प्रेमाची पडछाया आहे. बाह्य जगातील सर्वात महान प्रेमाला दहापट किंवा शंभरपट इतके वाढविल्यास आम्हाला आमच्या अंतरी वाहणाऱ्या प्रेमाची किंचीत जाणीव होऊ शकेल. अंतरीय प्रेमाची भेट ! आपण मृत्युसम अनुभवाबद्दल वाचल्यावर आपणास अंतरी वाहणाऱ्या प्रेमाचा थोडा बहुत अनुभव येईल. ज्यांना मृत्युसम अनुभव आले, त्यांनी एक प्रकाशमान व्यक्तीची भेट झाल्याबद्दल सांगितले आहे. त्यांना बाह्य जगात मिळणाऱ्या प्रेमापेक्षा अधिक प्रेम त्या व्यक्तीने दिले. त्या प्रेमाने त्यांचे रोम रोम पुलकित झाले. ह्या प्रेमाचा अनुभव घेतांना, त्यांना ईश्वरीय प्रेमाची गोडी व धुंदी अनुभवास मिळाली.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : घरातही, सासू सुनेला कामं सांगत नाही. ती सुनेला म्हणते, तुला हे जमणार नाही.

शिवानीदीदी : जेव्हा आपण जबाबदाऱ्या दुसऱ्यांना देत नाही तेव्हा आपण स्वतःला आणि दुसऱ्यांनाही न्याय देत नाही. जेव्हा आपण हे करतो तेव्हा त्यात दोघांचा फायदा असतो.

सुरेश ओबेरॉय : कदाचित आपल्याला सत्ता आपल्या हातून जाण्याची भीती असेल. शिवानीदीदी हो, पण आपल्या हे लक्षात येत नाही की, आपण एक फांदी सोडली नाही तर आपण नवीन फांदीवर कधी पोहोचणार नाही. जर आपण फांदी सोडली, तर आपण उंच उडू आणि नवीन शिखरं गाठू.

### पक्षी तज्ज्ञ

सुरेश ओबेरॉय : एकदा एका राजाने दोन पक्षी विकत आणले. त्यातला एक पक्षी उडायचा. राजाने सतत एका झाडाच्या फांदीवर बसून रहायचा, तर दुसरा सतत उंच एका प्रथितयश शेतकऱ्याला बोलावणं पाठवलं जो पक्ष्यांचासुद्धा तज्ज्ञ होता. जेव्हा त्याने मध्यस्थी केली तेव्हा पहिला पक्षीही उडायला लागला. राजाने शेतकऱ्याला

विचारलं की तूच त्याने पक्ष्याला कसं उडायला कसं लावलं? यावर तो शेतकरी म्हणाला, मी फक्त ती फांदी कापून टाकली.

शिवानीदीदी आपण इतरांना जबाबदाऱ्या देत नाही त्यामुळे आपण आपल्या क्षमतेच्या इतर अनेक चांगल्या गोष्टी करू शकत नाही. आपण सतत आपल्या फांदीला धरून राहतो आणि आपण खूप कामात आहोत असं स्वतःला सांगत राहतो. आपण जबाबदाऱ्या इतरांकडे सोपवायलाच हव्यात.

सुरेश ओबेरॉय : आणि हे करताना संपूर्ण विश्वास ठेवला पाहिजे.

शिवानीदीदी आपण त्यांना गोष्टी त्यांच्या पद्धतीने करण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे. त्यांच्याकडून एखादी चूक होऊ शकते हेही स्वीकारलं पाहिजे. कारण चुका होणं हा शिकण्याचा एक भाग आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : बंड्या, 'अकबर कोण होता?'

बंड्या : सर, तो 'अमर' आणि 'अँथनी'चा भाऊ होता!

## करूया स्पर्धा परिक्षांची तयारी

* दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी (१९३९-१९४५) सोव्हिएत युनियनचे हुकूमशहा नेते कोण होते? - जोसेफ स्टालिन

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## मुळा

१२) कैरीचे, लिंबाचे लोणचे बनविताना इतर मसाल्यांसोबत मेथीच्या बीचा वापर करावा. यामुळे लोणचे रुचकर तर होतेच, शिवाय त्यासोबत आरोग्यही चांगले राखते. या लोणच्यामुळे वातविकार होत नाहीत.

सावधानता : गर्भवतीने गर्भावस्थेमध्ये सहसा मेथीची भाजी व बीपासून बनविलेले पदार्थ खाऊ नयेत व खाल्ले तर अगदी कमी मात्रेत खावेत. कारण मेथीमुळे गर्भाशय आकुंचन होत असते व त्यामुळे गर्भपात होणे किंवा बाळाची वाढ कमी होणे अशा समस्या उद्भव शकतात. म्हणून शक्यतो मेथीचा वापर गर्भवतीने टाळलेलाच बरा.

हत्तीच्या दातासारखा दिसणारा पांढरा शुभ्र लांबलचक मुळा हा सर्वांच्याच मनाला भुरळ घालतो. आहारामध्ये मुळ्याचा वापर करण्यात येतो, त्याचबरोबर तो औषध म्हणूनही फार प्राचीन काळापासून वापरला जातो. मराठीत 'मुळा', हिंदीमध्ये 'मूली', संस्कृतमध्ये 'मूलक', इंग्रजीत 'रॅडिश', तर शास्त्रीय भाषेत 'राफ्नस सटायव्हस' म्हणून ओळखला जाणारा मुळा 'क्रुसीफेरी' या कुळातील आहे.

कंदमूळ असलेल्या या मुळ्याची पाने, शेंगा या सर्वांचाच आहारात उपयोग केला जातो. मुळा लाल व पांढरा अशा दोन प्रकारचा असतो. मुळा चवीला तिखट, किंचित गोड व जिभेला चरचरणारा असतो. मुळा कच्चा किंवा भाजी करूनही खावा. पानांचीही भाजी केली जाते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची

आपण देवाच्या दारात जातो, नवस बोलतो, तासन्तास रांगेत उभे राहतो; पण विचार करा – अशी कोणती ताकद असेल, ज्यामुळे साक्षात जगन्निवास, वैकुंठाचा राणा द्वारका सोडून माणसाच्या दारात येऊन उभा राहतो आणि तासंतास वाटही पाहतो? आणि देव दारात आल्यावरही तो माणूस मागे वळून न पाहता देवाला विटेवर उभे राहण्यास सांगतो! ही ताकद भक्त पुंडलिकाच्या ठायी जिथून आली ते नाव म्हणजे भक्त पुंडलिक यांचे गुरु कुक्कुट ऋषी!



संतकृपा झाली। इमारत फळा आली।। असे संत बहिणाबाईंनी वारकरी संप्रदायाच्या इमारतीचे वर्णन करताना म्हटले आहे. संत ज्ञानेश्वरांनी पाया रचला, नामदेवांनी विस्तार केला, एकनाथांनी खांब दिले आणि तुकारामांनी त्यावर कळस चढवला. परंतु, या भव्य दिव्य इमारतीचा 'मूळ बीज' किंवा 'पहिला अदृश्य दगड' कोण असेल, तर तो म्हणजे भक्त पुंडलिक. आणि या पुंडलिकाच्या पाषाणहृदयाला भक्तीचा पाझर फोडणारे, त्याला जीवनाची खरी दिशा दाखवणारे महामेरू म्हणजे 'कुक्कुट ऋषी'.

आज संपूर्ण महाराष्ट्र आणि देश विठ्ठल माऊलीच्या भक्तीत दंग आहे. पण विचार करा, जर कुक्कुट ऋषी नसते, तर पुंडलिकाचे हृदयपरिवर्तन झाले असते का? पुंडलिकाने माता-पित्याची सेवा केली नसती तर विठ्ठल द्वारका सोडून विटेवर उभा राहिला असता का? निश्चितच नाही. म्हणूनच, कुक्कुट ऋषींमुळेच देवाला द्वारका सोडून पंढरपुरात यावे लागले, हे विधान त्रिकालाबाधित सत्य आहे. आज कुक्कुट ऋषींचे वास्तव स्थान, त्यांची अद्भूत साधना आणि त्यांचे अलौकिक कार्य तुमच्या समोर मांडत आहे.

कुक्कुट ऋषींच्या वास्तव्याबद्दल आणि आश्रमाबद्दल पौराणिक आणि भौगोलिक संशोधनात महत्त्वाची माहिती मिळते. त्यांचा आश्रम कुठे होता, याबद्दल दोन मुख्य प्रवाह जोडलेले आहेत, जे त्यांच्या साधनेची व्यापकता दर्शवतात.

स्कंद पुराण आणि पद्म पुराणातील कथांनुसार, कुक्कुट ऋषींचा मुख्य आश्रम काशी (वाराणसी) च्या बाह्य भागात किंवा विंध्य पर्वताच्या रांगांमध्ये होता. भक्त पुंडलिक जेव्हा आपल्या आई-वडिलांना घेऊन काशी यात्रेला निघाला होता, तेव्हा वाटेत किंवा काशी क्षेत्राच्या सीमेवर त्याला कुक्कुट ऋषींचा आश्रम लागला.

काही संशोधक आणि स्थानिक आख्यायिकांनुसार, कुक्कुट ऋषींचे वास्तव्य दख्खनच्या पठारावर आणि विशेषतः दक्षिण भारततही मानले जाते. महाराष्ट्रातील कोकण आणि कोल्हापूरच्या सीमेवर, तसेच वारकरी संप्रदायाच्या प्राचीन पाऊलखुणा शोधताना 'कुक्कुटेश्वर' नावाच्या स्थानांचा उल्लेख येतो.

परंतु, ऐतिहासिक दृष्ट्या पुंडलिकाच्या प्रवासाचा मार्ग पाहता, उत्तर भारत आणि मध्य भारताला जोडणाऱ्या प्राचीन व्यापारी आणि तीर्थक्षेत्रीय मार्गावर (ज्याला जुना 'काशी मार्ग' म्हटले जायचे) कुक्कुट ऋषींची 'तपोभूमी' होती. आजच्या भौगोलिक रचनेत हा भाग मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशच्या सीमेवरील विंध्य प्रदेशात मोडतो.

कुक्कुट ऋषींची साधना कोणत्याही जंगलात जाऊन, अन्नाचा त्याग करून किंवा एका पायावर उभे राहून केलेली पारंपारिक साधना नव्हती. त्यांची साधना अत्यंत व्यावहारिक, जिवंत आणि क्रांतिकारी होती.

कुक्कुट ऋषींनी उपनिषदांमधील मातृदेवो भव। पितृदेवो भव। या वचनाला प्रमाण मानून फक्त आईवडिलांची सेवाच ईश्वरीय साधना मानत. त्यांचे वृद्ध माता-पिता हेच त्यांचे काशी-रामेश्वर होते. ते मानत असत की, ज्या माता-पित्याने आपल्याला जन्म दिला, जगात आणले, त्यांची सेवा करणे हेच अंतिम सत्य आहे.

कुक्कुट ऋषींनी कधीही कुठल्या तीर्थक्षेत्राची वारी केली नाही. त्यांनी कधी गंगेत स्नान केले नाही की कधी हिमालयात जाऊन तपाचरण केले नाही. त्याची एकच अखंड साधना म्हणजे – माता-पित्यांची सेवा करणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे. या साधनेमुळे त्यांच्या आश्रमात अशी सात्त्विक ऊर्जा निर्माण झाली होती, जी मोठ्या मोठ्या योग्यांनाही थक्क करणारी होती.

भक्त पुंडलिक हा सुरुवातीला आई-वडिलांचा छळ करणारा, पत्नीच्या शब्दाखातर स्वतः घोड्यावर बसून वृद्ध आई-वडिलांना पायी चालवणारा एक कृतघ्न मुलगा होता. काशीला जात असताना तो एका रात्री कुक्कुट ऋषींच्या आश्रमात मुक्कामास थांबला.

रात्रीच्या वेळी पुंडलिकाने कुक्कुट ऋषींना पाहिले. ऋषी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत मग्न होते. पुंडलिकाने गर्वाने ऋषींना विचारले, तुम्ही एवढे मोठे ऋषी आहात, मला काशीचा मार्ग सांगू शकाल का? त्यावर कुक्कुट ऋषींनी शांतपणे उत्तर दिले, तरुणा, मला काशीचा मार्ग माहीत नाही. कारण मी आयुष्यात कधीही कोणत्याही तीर्थयात्रेला गेलो नाही. माझे आई-वडील हेच माझे सर्वात मोठे तीर्थक्षेत्र आहेत आणि मी त्यांच्याच सेवेत आनंदी आहे. पुंडलिकाने मनातल्या मनात या ऋषींची थट्टा केली की, हा कसला ऋषी ज्याने कधी गंगास्नानही केले नाही!

त्याच रात्री मध्यरात्री पुंडलिकाला एक अद्भूत दृश्य दिसले. अत्यंत मलिन, काळे कुट्ट आणि मळलेले वस्त्र परिधान केलेल्या तीन स्त्रिया आश्रमात आल्या. त्यांनी अत्यंत आदराने कुक्कुट ऋषींच्या आश्रमाचे अंगण झाडले, सडा-रांगोळी केली आणि ऋषींच्या कुटीला प्रदक्षिणा घातली. कुटीतून बाहेर पडताना, त्या स्त्रियांचे रूप पालटले होते. त्या कोट्यवधी सूर्यांपेक्षाही अधिक तेजस्वी, सुंदर आणि दैवी दिसत होत्या.

पुंडलिक हे पाहत होता. तो धावत पुढे गेला आणि त्याने त्यांचे पाय धरून विचारले, मातांनो, तुम्ही कोण आहात? येताना तुम्ही एवढ्या मलीन होता आणि जाताना एवढ्या पवित्र कशा झालात? तेव्हा त्या स्त्रियांनी उत्तर दिले, आम्ही गंगा, यमुना आणि सरस्वती आहोत.

पुंडलिक चकित झाला. गंगा नदीने सांगितले, जगातील करोडो पापी लोक आमच्या पात्रात स्नान करून आपली पापे आमच्यात सोडतात. त्यामुळे आम्ही रोज रात्री मलीन आणि काळ्या पडतो. परंतु, कुक्कुट ऋषी हे या पृथ्वीवरील असे महापुरुष आहेत, जे अहोरात्र आपल्या माता-पित्याची निस्सीम सेवा करतात. त्यांच्या या सेवेमुळे त्यांच्यात एवढे पुण्य आणि पवित्रता जमा झाली आहे की, त्यांच्या आश्रमाची धूळ आणि त्यांचा केवळ स्पर्श लाभण्यासाठी आम्ही रोज इथे येतो. त्यांच्या पुण्याने आमची पापे धुऊन निघतात आणि आम्ही पुन्हा पवित्र होतो.

गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या तोंडून हे शब्द ऐकल्यावर पुंडलिकाच्या मस्तकात जणू ज्ञानाचा प्रकाश पडला. त्याच्या अहंकाराचा डोंगर क्षणात कोसळला. नद्यांनी पुंडलिकाला थेट शब्दांत फटकारले, तुझ्यासारखा पापी, जो स्वतःच्या वृद्ध आई-वडिलांना घोड्यामागे पायी चालवून काशीला आणत आहे, त्याचे पाप धुण्याची ताकद आमच्यातही नाही. कुक्कुट ऋषींचा आदर्श घे, तरच तुझा उद्धार होईल.

पुंडलिक धावत कुक्कुट ऋषींच्या पाया पडला. त्याने ऋषींची माफी मागितली. कुक्कुट ऋषींनी त्याला उठवले आणि सांगितले, पुंडलिका, देव कुठल्या दगडा-धोंड्यामध्ये किंवा काशी-द्वारकेत नाही. देव तुझ्या घरात आहे. ज्या माता-पित्याने तुला वाढवले, त्यांची सेवा कर. तीच खरी भक्ती आहे.

कुक्कुट ऋषींच्या या एकाच उपदेशाने पुंडलिकाचे जीवन बदलले आणि तेव्हापासून पुंडलिक यांनी त्यांना आपला गुरु मानले. त्याने काशीला जाण्याचा विचार सोडून दिला. तो तिथूनच मागे फिरला आणि आपल्या माता-पित्याला घेऊन पंढरपूर जवळील 'दिंडीरवन' (आजचे पंढरपूर) येथे आला.

आता पुंडलिकाने कुक्कुट ऋषींना आपला मानसगुरू मानले होते आणि त्यांच्याच साधनेचा मार्ग स्वीकारला होता. पुंडलिक आता चोवीस तास माता-पित्यांची सेवा करू लागला. त्याची ही सेवा इतकी पराकोटीची होती की, तिची कीर्ती थेट वैकुंठापर्यंत आणि द्वारकेपर्यंत पोहोचली.

स्वतः भगवान श्रीकृष्ण (द्वारकाधीश विठ्ठल) पुंडलिकाची ही मातृ-पितृ भक्ती पाहण्यासाठी द्वारका सोडून पंढरपुरात आले. जेव्हा भगवंत पुंडलिकाच्या दारात उभे राहिले, तेव्हा पुंडलिक आपल्या आई-वडिलांचे पाय चेपत होता. देवाने मागून आवाज दिला, पुंडलिका, मी द्वारकेचा राणा तुला दर्शन देण्यासाठी आलो आहे.

पण पुंडलिकाची निष्ठा बघा! कुक्कुट ऋषींनी दिलेल्या शिकवणीनुसार, आई-वडिलांची सेवा ही देवापेक्षाही मोठी होती. पुंडलिकाने मागे न पाहता शेजारी पडलेली एक 'वीट' देवाच्या दिशेने सरकवली आणि म्हणाला, देवा, माझ्यासाठी माझे आई-वडील आधी आहेत. त्यांची सेवा पूर्ण होईपर्यंत या विटेवर उभे राहा.

भगवंताला पुंडलिकाचा हा बाणा आणि कुक्कुट ऋषींच्या साधनेचा हा जिवंत वारसा एवढा आवडला की, देव दोन्ही हात कंबरेवर ठेवून त्या विटेवर उभा राहिला. तो आजतागायत २८ युगे त्या विटेवर उभा आहे.

या संपूर्ण इतिहासाचा गांभीर्याने विचार केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, जर कुक्कुट ऋषी नावाचे दीपस्तंभ त्या वाटेवर उभे नसते, तर पुंडलिकाचा अहंकार कधीच नष्ट झाला नसता. पुंडलिक एक सामान्य पापी माणूस म्हणून जगला असता. पंढरपूरचे विठ्ठल पीठ कधी निर्माण झालेच नसते. महाराष्ट्राला संतांची भूमी बनवण्याचे, वारकरी पंथाची गंगोत्री वाहण्याचे मूळ श्रेय कुक्कुट ऋषींच्या 'पितृभक्ती'च्या साधनेला जाते.

आजच्या २१ व्या शतकात, जिथे वृद्धाश्रम वाढत आहेत, मुले आपल्या वृद्ध आई-वडिलांना सांभाळायला कंटाळत आहेत, तिथे कुक्कुट ऋषींचे वास्तव आणि त्यांची साधना जगासमोर येणे अत्यंत गरजेचे आहे.



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## बलवान शरीर देते मनाला धीर

संकलन: दिशान फिचर्स

शिवभक्तांचे रसेश्वरदर्शन नावाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. त्यात म्हटले आहे, आयतनं विद्याना मूलं धर्मार्थकाम मोक्षाणाम। श्रेय परं किमन्यद शरीरमजरामरं विहाकैकम

बलवान शरीर देते मनाला धीर, बनवते वीर. सद्गुण आहेत, सुविचार आहेत, सत्ताचे संस्कार आहेत, पण शरीर दुबळे असेल तर या सर्वांचा काय उपयोग? विद्या मिळवायची म्हटलं, तरी अंगात शक्ती हवी. समाजाच्या उद्धारासाठी झटतो म्हटलं, तरी अंगात ताकद हवी. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण यापैकी कुठल्याही क्षेत्रात होणारे पदार्पण अंगात बळच नसेल तर विनाकारण ठरेल. बा माणसा, निरामय, तेज:पुंज, बलदंड, पिळदार शरीर, यापेक्षा अधिक किफायतशीर दुसरे काय आहे बरं?




मुण्डक उपनिषदसुद्धा हेच सांगते, नायमात्मा, बलहीनेन लभ्य. आत्मोन्नती होणार कशी, जर नसेल अंगात ताकद खाशी? आणि म्हणूनच म्हणतात, बलमुपास्व. आधी शरीर कमवा, मग दुष्टांना नमवा.

महाकवी कालिदास आपल्या कुमारसंभव नावाच्या महाकाव्यात हेच सांगतो. शंकरप्राप्तीसाठी कठोर तपस्या करणाऱ्या पार्वतीचे शरीर कृश झाले होते. साधुवेषात तेथे आलेल्या शंकराने पार्वतीचे कृश शरीर पाहून म्हटले, अगं, तप करायलाही बल हवं, शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम. निरोगी आणि बलयुक्त शरीर हवेच कर्तव्य पार पाडायचे तर, रोगमुक्त, बलयुक्त आणि उत्साहउद्युक्त व्यक्तीच धर्म, अर्थ काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त करू शकते.

अहमद फराज नावाचा उर्दू शायर म्हणतो,

कुछ अहले सितम कुछ अहले हशम मैखाना गिराने आये थे दहलीज को चुमके छोड गये देखा की ये पत्थर भारी है

आले होते काही चांडाळ काही नोकरदार एक गुत्ता तोडायला, पण उंबरठ्यावरच जिरली त्यांची ताकद कुठे होती अंगात ? उंबरठ्याचाच दगड वाटला भारी. गेले पळून आले तसे.

एका राजाला सेनापती नेमायचा होता. अजरामर शरीराची व्यक्ती हवी. म्हणून त्याने दवंडी दिली. अनेक शूर वीर शिपाई मुलाखतीला आले. पिळदार शरीर आणि कांतिमान चेहरे. त्यांना एका दालनात बसविण्यात आले. राजाचे सिंहासन पलीकडच्या दालनात होते. तिकडे जायला एक अरुंद दार होते. एक आज्ञा झाली. सगळ्यांनी राजाच्या दालनात गोळा व्हावं. जमलेल्या वीरांपैकी बहुतेक जण अरुंद दाराकडे धावले. मी पुढे मी आधी जाईन म्हणून भांडायला लागले. एकमेकांना गुद्दे, लाथा मारू लागले. अखेरीस तलवार काढून लढले व मेले.

फक्त एक बदलंड शूर योद्धा हा सर्व प्रकार संपल्यावर हळूच आत शिरला. शांतपणे राजापुढे उभा राहिला. राजाचा सेनापती झाला.

शरीर अजरामर असावे. दुर्बलत्व नसणे म्हणजे अजर असणे. क्रोध न येणे, दांडगाई न करणे हे अमरत्व जगणे. **– किशोर गांधी**

# नगरच्या शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दुर्बिणीद्वारे मूत्रपिंड काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वी

नगर – येथील शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये २३ वर्षीय युवकावर दुर्बिणीद्वारे मूत्रपिंड काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली.

संबंधित रुग्णाचे डावे मूत्रपिंड पूर्णपणे निकामी झाले होते. त्यामुळे त्याला वारंवार तीव्र वेदना होत होत्या. त्याच्या दैनंदिन जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होत होता. आवश्यक वैद्यकीय तपासण्यांनंतर निकामी झालेल्या मूत्रपिंडामुळेच ही समस्या उद्भवत असल्याचे निदान करण्यात आले. यानंतर अत्याधुनिक मिनिमली इन्वेसिव्ह तंत्रज्ञानाचा वापर करून दुर्बिणीद्वारे निकामी झालेले मूत्रपिंड यशस्वीरित्या काढण्यात आले. या शस्त्रक्रिया पद्धतीमध्ये मोठा चिरा द्यावा लागत नसल्याने शस्त्रक्रियेनंतर वेदना, रक्तस्राव आणि संसर्गाचा धोका कमी राहतो. तसेच रुग्ण लवकर बरा होऊन दैनंदिन जीवनात परतू शकतो. ही शस्त्रक्रिया युरोलॉजिस्ट डॉ. दीपक बी. गाडेकर यांनी भूलतज्ज्ञ डॉ. तेजल कंठाळी यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पाडली. यावेळी शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या ऑपरेशन थिएटर, नर्सिंग तसेच इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

यशस्वी उपचारानंतर रुग्णाची प्रकृती उत्तम असून त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मूत्ररोगांवरील आधुनिक व सुरक्षित शस्त्रक्रिया नियमितपणे केल्या जात असून रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती रुग्णालयाच्या वतीने देण्यात आली.

# श्री माहेश्वरी पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी बजरंग दरक तर रविकांत काबरा सचिव





नगर – श्री माहेश्वरी पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी बजरंग दरक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ट्रस्टची वार्षिक सभा संस्थेचे अध्यक्ष ॲड. महेश काबरा यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या सभेत दरक यांची सण २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी एकमताने अध्यक्षपदी निवड झाली. यावेळी संस्थेचे ट्रस्टी, इतर पदाधिकारी तसेच कार्यकारी मंडळाचीही निवड करण्यात आली.

बजरंग दरक हे गेल्या १३ वर्षापासून संस्थेचे खजिनदार म्हणून काम पाहत होते. त्यांच्या चोख व प्रामाणिक योगदानामुळे संस्था भरभराटीस येण्यास मदत झाली. सभेमध्ये संस्थेचे ट्रस्टी म्हणून श्यामसुंदर सारडा, मदनलाल मालपाणी, मोहनलाल मानधना, श्यामसुंदर जाखोटिया, ओमप्रकाश चांडक यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी विनोद मालपाणी, सचिवपदी रविकांत काबरा, सहसचिव श्रीनिवास सारडा, खजिनदार नंदकिशोर झंवर यांची निवड झाली.

संस्थेच्या कार्यकारी मंडळात अतुल डागा, मुकुंद धूत, धीरज लड्डा, राजेंद्र सारडा, विजय जाखोटिया, भरत जाखोटिया, बालकिसन जाखोटिया, राहुल सारडा, रामेश्वर बियाणी, केदार लाहोटी, राहुल सारडा, सुरज सोमानी यांची निवड करण्यात आली.

# 'फ्रेंड्स मॉन्सून क्रिकेट लीग – कॉर्पोरेट'ला प्रतिसाद

### तेजस करमरकर, प्रकाश राठोड व चैतन्य खोलगडे यांचे आयोजन; साईदीप हिरोजचे अध्यक्ष संदीप घोडके यांचे मार्गदर्शन

नगर – कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गाला दैनंदिन कामाच्या तणावातून दिलासा मिळावा, त्यांच्यामध्ये सांघिक भावना, मैत्री आणि निरोगी स्पर्धेची जाणीव वाढावी या उद्देशाने 'फ्रेंड्स मॉन्सून क्रिकेट लीग – कॉर्पोरेट' या अनोख्या क्रिकेट स्पर्धेचे रविवारी उत्साहात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये सहा संघांचा सहभाग आहे. या स्पर्धेचे आयोजन तेजस करमरकर, प्रकाश राठोड आणि चैतन्य खोलगडे यांनी केले असून, साईदीप हिरोजचे अध्यक्ष संदीप घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी माजी रणजी क्रिकेटपटू अनुपम संकलेचा तसेच उद्योजक वसीम हुंडेकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना, कॉर्पोरेट क्षेत्रातील धकाधकीच्या जीवनात मानसिक व शारीरिक आरोग्य जपण्यासाठी अशा क्रीडा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.



'फ्रेंड्स मॉन्सून क्रिकेट लीग – कॉर्पोरेट' या अनोख्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये नगर डिस्ट्रीक्ट सिनियर विरुद्ध क्रिकेट स्टार करंजी आणि नगर चॅम्पियन्स विरुद्ध शिवराज ॲड्वोकेट्स वॉरियर असे सामने खेळवण्यात आले. यामध्ये नगर डिस्ट्रीक्ट सिनियर आणि शिवराज ॲड्वोकेट वॉरियर यांनी अनुक्रमे विजय मिळवला.

ही लीग विशेषतः कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी वर्गासाठी असून, सामने दर शनिवार आणि रविवारी आयोजित करण्यात येणार आहेत. आठवडाभराच्या कामाच्या तणावातून मुक्तता मिळावी, सहकाऱ्यांमध्ये सुसंवाद व टीमवर्क वाढावे आणि खेळाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेला विविध कंपन्यांतील खेळाडू व क्रिकेटप्रेमींचा प्रतिसाद लाभला. आगामी काळात या लीगचे अधिक व्यापक स्वरूपात आयोजन करून कॉर्पोरेट क्षेत्रातील अधिकाधिक कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.



शहरातील नवी पेठ जैन धर्मस्थानक येथे उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषीजी महाराज तसेच तीर्थंकरऋषीजी महाराज यांचे मंगल आगमन झाले. त्यांच्या आगमनानिमित्त नवी पेठ परिसरातील जैन समाज, जय आनंद महावीर युवक मंडळ आणि आनंद चालीसा ग्रुप यांच्या वतीने भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

# उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषीजी म.सा. यांचे नवी पेठ येथील 'जैन धर्मस्थानकात' स्वागत

### हजारो भाविकांनी घेतला प्रवचनाचा लाभ

नगर – शहरातील नवी पेठ जैन धर्मस्थानक येथे उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषीजी महाराज तसेच तीर्थंकरऋषीजी महाराज यांचे मंगल आगमन झाले. त्यांच्या आगमनानिमित्त नवी पेठ परिसरातील जैन समाज, जय आनंद महावीर युवक मंडळ आणि आनंद चालीसा ग्रुप यांच्या वतीने भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

यावेळी श्री प्रवीणऋषीजी महाराज यांनी आपल्या प्रवचनातून नवी पेठ जैन धर्मस्थानकाचा गौरवशाली इतिहास, येथील धार्मिक परंपरा आणि धर्मस्थानकाचे आध्यात्मिक महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या ओजस्वी आणि प्रेरणादायी प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी नगर शहरासह परिसरातील जैन समाजातील भाविकांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमात चातुर्मास समितीचे प्रमुख अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी आपल्या मनोगतात नवी पेठ जैन धर्मस्थानकाच्या स्थापनेपासूनच्या अनेक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी आठवणींना उजाळा दिला. धर्मस्थानकाच्या जडणघडणीत ज्येष्ठ समाजबांधवांनी केलेले योगदान, समाजातील एकोप्याची परंपरा आणि धार्मिक संस्कार जपण्याचे महत्त्व त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. तसेच श्री प्रवीणऋषीजी महाराज यांच्या आगमनामुळे नवी पेठ परिसराला आध्यात्मिक ऊर्जा लाभली असून, अशा धार्मिक कार्यक्रमांमधून युवकांनी धर्म, संस्कार आणि समाजसेवेची प्रेरणा घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जय आनंद युवक मंडळ, आनंद चालीसा ग्रुप तसेच नवी पेठ परिसरातील युवक-युवती आणि नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. याबाबत माहिती देताना अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी सांगितले की, महाराजांच्या आगमनामुळे नवी पेठ परिसरात धार्मिक आणि आध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भाविकांना त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनाचा लाभ मिळाला आहे.

या प्रसंगी चातुर्मास समितीचे बाबुशेठ बोरा, शैलेश मुनोत, वसंत लोढा, पारस लोढा, सुभाष भंडारी, ईश्वर बोरा, आनंद मुथा, सत्यन मुथा, सचिन डागा आदींनी महाराजांचे स्वागत केले.

कार्यक्रमात नेहा ओसवाल आणि पद्माताई गांधी यांनी भक्तिमय स्तवन सादर करून वातावरण अधिक मंगलमय केले. तसेच आनंद पाठशाळेतील विद्यार्थिनींनी आकर्षक लेझीम नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी श्री जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने नवकारशीची व्यवस्था करण्यात आली. या सोहळ्यास जय आनंद महावीर युवक मंडळाचे पदाधिकारी, आनंद चालीसा ग्रुपचे सदस्य, भाविक उपस्थित होते.

# तहसील कार्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली शासकीय कामकाजाची प्रत्यक्ष ओळख

### 'अमृत संवाद सेतू' उपक्रमातून प्रशासनाचा विद्यार्थ्यांबरोबर सुसंवाद

नगर – युवक-युवतींना शासकीय कार्यालयीन कामकाजाची प्रत्यक्ष ओळख व्हावी, प्रशासनाची कार्यपद्धती समजावी, प्रशासन व नागरिक यांच्यात विश्वासाचे नाते दृढ व्हावे, या उद्देशाने 'अमृत' संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'अमृत संवाद सेतू' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर तहसील कार्यालयाला भेट देऊन महसूल प्रशासनाच्या कामकाजाची सविस्तर माहिती घेतली.



यावेळी तहसीलदार स्वप्नील ढवळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शासकीय कार्यालयांविषयीची अनाठायी भीती मनातून दूर करून प्रशासनाशी सकारात्मक संवाद ठेवण्याचे आवाहन केले. प्रशासन हे नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत असून शासनाच्या विविध योजना आणि सेवा प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यात प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे.

प्रशासन आणि युवक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणाऱ्या 'अमृत संवाद सेतू' उपक्रम कौतुकास्पद आहे. युवकांना लोकाभिमुख प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यासाठी तसेच प्रशासनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे श्रीमती ढवळे यांनी नमूद केले.

उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना तहसील कार्यालयातील आवक-जावक विभाग, महसूल शाखा, विविध शासकीय दाखले मंजुरी प्रक्रिया तसेच लेखा विभागाच्या कार्यपद्धतीची माहिती देण्यात आली. कार्यालयीन दैनंदिन कामकाज, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

अधिकारी सौ. श्रद्धा पारगावकर यांनी महसूल विभागाच्या विविध कामकाजाची माहिती देत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. या संवादातून विद्यार्थ्यांच्या मनातील विविध शंकांचे निरसन होऊन शासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीबाबत त्यांची समज अधिक व्यापक झाली. अभ्यास दौऱ्यात 'अमृत' संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे, अमृत मित्र वैभव कुलकर्णी, शरद क्षीरसागर, संदीप देशपांडे, गौरी कुलकर्णी, सुजल झुंजारे, अर्चना बनकर, वर्षा सागडे तसेच विद्यार्थी सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी 'अमृत' संस्थेचे आभार व्यक्त केले. प्रशासनाशी विश्वासाचे नाते दृढ करण्यास आणि युवकांना लोकाभिमुख प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत ३१ जुलैपर्यंत सहभागी होण्याचे आवाहन

नगर – राज्यात सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून चालू खरीप हंगाम ात सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी झाल्यास नुकसान भरपाई मिळणार आहे. हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेता शेतकऱ्यांच्या आर्थिक संरक्षणासाठी ही योजना महत्त्वाची असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलै पूर्वी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे संचालक विनयकुमार आवटे यांनी केले आहे.

खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस व खरीप कांदा या १४ पिकांसाठी योजनेचा लाभ घेता येणार आहे. यासाठी विमा संरक्षित रकमेच्या दोन टक्के हप्ता भरावा लागणार असून कापूस व कांदा या नगदी पिकांसाठी पाच टक्के हप्ता आकारला जाणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्रावर पीक असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांना राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर बँक, सामूहिक सेवा केंद्र किंवा स्वतः ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अर्जासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक व आधारशी संलग्न बँक खाते आवश्यक आहे. तसेच डिजिटल क्रॉप सर्वेअंतर्गत पिकाची नोंद करणे बंधनकारक असून त्यातील नोंद व विमा अर्जातील पिकामध्ये तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द करण्यात येईल. चुकीच्या मार्गाने अर्ज करून गैरफायदा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे कृषी विषयक योजनांचा लाभ मिळणार नाही.

कर्जदार शेतकऱ्यांनी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत योजनेत सहभागी व्हावे. योजनेत सहभागी होण्याची इच्छा नसल्यास विहित मुदतीत बँकेला लेखी कळविणे आवश्यक आहे. सामूहिक सेवा केंद्र चालकाला विमा कंपनीकडून प्रति अर्ज ६० रुपये मानधन दिले जात असल्याने शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क देऊ नये.

अहिल्यानगर जिल्ह्यासाठी इफ्को टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. योजनेबाबत अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जवळील बँक किंवा १४४४७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# 'उपवर्गीकरण रद्द करा, संविधान वाचवा' मागणीसाठी ९ ऑगस्टला अहिल्यानगर शहरात समस्त आंबेडकरी समाजाचा 'विराट मोर्चा'

### सिद्धार्थ बुद्ध विहार येथे झालेल्या बैठकीत निर्णय; उपवर्गीकरणाविरोधात तीव्र भूमिका, सहभागी होण्याचे आवाहन


अहिल्यानगर शहरातील सिद्धार्थ बुद्ध विहार, सिद्धीबाग येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांची बैठक पार पडली.

नगर – अहिल्यानगर शहरातील सिद्धार्थ बुद्ध विहार, सिद्धीबाग येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांची बैठक पार पडली. या बैठकीत अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाला तीव्र विरोध नोंदविण्यात आला. तसेच संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचविणाऱ्या निर्णयांविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेनंतर ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त अहिल्यानगर शहरात विराट संविधान बचाव मोर्चा काढण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. या मोर्चामध्ये जिल्हाभरातील समस्त आंबेडकरी समाज, विविध सामाजिक संघटना, शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी तसेच संविधानप्रेमी नागरिक सहभागी होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक, माळीवाडा, पांचवीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, टेली खुंट, नेतासुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्लीगेटमार्गे नीलक्रांती चौक येथे समारोप होणार आहे.

बैठकीत उपस्थित वक्त्यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेच्या परिशिष्टात समाविष्ट असलेल्या अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा अधिकार हा संसदेचा विषय आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना त्या संदर्भातील अधिकार देणारा निर्णय दिल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या निर्णयामुळे समाजात जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असून, विविध जातींमध्ये संघर्षाचे वातावरण तयार होऊ शकते, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

तसेच भारतीय राज्यघटनेच्या परिशिष्टात समाविष्ट असलेल्या ५९ अनुसूचित जातींच्या यादीत कोणताही बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच असल्याचे मत बैठकीत मांडण्यात आले. उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द होईपर्यंत संविधान व सामाजिक न्यायाच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीस समस्त आंबेडकरी समाजाचे अनुयायी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शासकीय सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी ९ ऑगस्टला होणाऱ्या संविधान बचाव मोर्चात जिल्ह्यातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले.

# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत 'वॉरियर्स'च्या २० स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण


'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत वॉरियर्सच्या २० स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

नगर – 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संगणक विभागाच्या सहकार्याने सायबर वॉरियर्सच्या २० स्वयंसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश स्वयंसेवकांना सायबर जनजागृती, व्यावसायिक कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व क्षमता आणि त्यांच्या अंगी असलेल्या गुणांची ओळख करून देत भविष्यातील जबाबदाऱ्यांसाठी सक्षम बनविणे हा होता.

या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीप भालसिंग, उपप्राचार्य विलास नाबडे, संगणक विभागाचे विभागप्रमुख रझ्झाक सर तसेच रोजगार समन्वयक निवेदिता काळे यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित झालेले अहमदनगर सायबर वॉरियर्सचे हे २० स्वयंसेवक भविष्यात विविध सायबर जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार आहेत.

या प्रसंगी क्लिक हील फाउंडेशनतर्फे दीपू सिंह यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ सायबर सुरक्षेचे तांत्रिक प्रशिक्षणच दिले नाही, तर प्रत्येक स्वयंसेवकामधील वेगवेगळे गुण, कौशल्ये आणि नेतृत्व क्षमता ओळखण्यासाठीही विशेष प्रयत्न केले. संवादात्मक उपक्रम, गटचर्चा आणि प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी स्वयंसेवकांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून देत त्यांचा प्रभावी विकास करण्यासाठी प्रेरित केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी झालेल्या २० स्वयंसेवकांनी उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध संकल्पना, प्रभावी संवाद कौशल्य, सांघिक कार्यपद्धती, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबी आत्मसात केल्या. या प्रशिक्षणामुळे प्रत्येक स्वयंसेवकाला स्वतःची क्षमता, कौशल्ये आणि वैशिष्ट्यपूर्ण गुण ओळखण्याची संधी मिळाली.

या प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अहमदनगर सायबर वॉरियर्सतर्फे अहमदनगर महाविद्यालयाच्याव्यवस्थापनाचे, संगणक विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचारीवर्गाचे तसेच क्लिक हील फाउंडेशनचे आभार व्यक्त करण्यात आले. प्रशिक्षणासाठी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल दीपू सिंह यांचे विशेष आभार मानण्यात आले.

सायबर सुरक्षेबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांची प्रभावी फळी तयार करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरले असून, आगामी काळात अहमदनगर सायबर वॉरियर्स विविध शैक्षणिक संस्था व सामाजिक स्तरावर सायबर सुरक्षा जनजागृती अभियान अधिक व्यापकपणे राबविणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पुण्यानुमोदन म्हणजे गेलेल्या व्यक्तीने हयात असताना केलेल्या चांगल्या कार्याचे स्मरण ठेवणे

### भास्कर साळवे यांचे प्रतिपादन


निर्मलनगर येथील बौद्ध संस्कार संघाच्या महा उपासिका सौ. उषा मिराजी साळवे यांच्या पुण्यानुमोदन व जलदान विधी कार्यक्रम पार पडला. यावेळी भास्कर साळवे यांनी प्रवचन करून मार्गदर्शन केले. एम.बी. साळवे, रामदास साळवे आदी. (छाया – विजय मते)

नगर – माणूस हा जीवन जगताना तो किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला याला महत्त्व असते. बौद्ध धर्मात मृत व्यक्तीच्या स्मरणात त्याच्या आत्म्याला सद्गतीसाठी केला जाणारा पुण्यानुमोदन आणि जलदान विधी महत्त्वाचा असतो. पुण्य + अनुमोदन म्हणजे मृत व्यक्तीने हयात असताना केलेल्या चांगल्या कार्याचे स्मरण ठेवून त्या कार्याला अनुमोदन देणे या साठी हा विधी असतो.असे प्रज्ञारत्न कमलवीर भास्कर साळवे यांनी प्रवचन करताना मार्गदर्शन केले.

निर्मलनगर येथील बौद्ध संस्कार संघाचे महाउपासिका स्मृतीशेष सौ.उषा मिराजी साळवे यांच्या पुण्यनुमोदन जलविधी कार्यक्रमात साळवे बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी एम.बी.साळवे, रामदास साळवे, साहेबराव साळवे आदी उपस्थित होते.

भास्कर साळवे पुढे म्हणाले जीवनाची अनित्यता, दानाचे महत्त्व यामुळे लोकांना पुण्य कसे अनुमोदन करावे हे समजते. या विधीमुळे दुःखाचे निवारण करणे हा हेतू असतो गेलेल्या व्यक्तीबद्दल शोक करू नका, त्यामुळे दुःख वाढते. आचार, विचार शुद्ध ठेवा. शोक व्यर्थ आहे. गेलेल्यांची आठवण जरूर काढा, पण दुःख व्यक्त करू नका, असे ते म्हणाले.

यावेळी बौद्ध संस्कार संघाच्या अनेक उपासकांनी सौ. उषा साळवे यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या समवेत काम करताना आलेल्या आठवणी व्यक्त केल्या.

सूत्रसंचालन बौद्धाचार्य भाऊसाहेब देठे यांनी केले तर उपस्थित अनुयायी यांचे एम.बी.साळवे यांनी ऋण व्यक्त केले.

# 'आयएमएस'मध्ये एम.बी.ए., एम.सी.ए., बी.बी.ए. तसेच बी.सी.ए. प्रवेशासाठी 'सुविधा केंद्र' सुरू

नगर – प्रत्येक वर्षी एम. बी. ए., एम. सी. ए., बी. बी. ए. तसेच बी. सी. ए. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना आपली नोंदणी तसेच कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक असते.

शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये होणाऱ्या या चारही प्रवेशांसाठी सी. ई. टी. सेल, महाराष्ट्र राज्य शासन यांचे सुविधा केंद्र (फॅसीलिटेशन सेंटर) शहरातील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आय एम एस) येथे सुरू आहे. या सुविधा केंद्रात सी ई टी सेल च्या सर्व सुविधा विनामुल्य देण्यात येत आहेत. तरी वर्ष २०२६ मध्ये एम बी ए, एम सी ए, बी ए, बी सी ए त प्रवेश घेऊ इच्छित असणाऱ्या विद्यार्थी, पालक यांनी आय एम एस येथे या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालक डॉ. एम बी मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी केले आहे.

या संदर्भात काही माहिती हवी असल्यास एम. बी. ए. साठी डॉ. सय्यद (९८८१४५८५७९), एम. सी. ए. साठी डॉ. भक्कड (९८५०५८५५५१), बी बी ए साठी डॉ. भावसार (९९६०४५९६०७) व बी. सी. ए. साठी डॉ. मुदस्सर (९८२३१००७५६) यांच्या शी संपर्क साधावा.

# स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेचा मराठा वधू–वर परिचय मेळावा उत्साहात


स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेचा मराठा वधू–वर परिचय मेळावा उत्साहात झाला.

नगर – स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था आयोजित मराठा वधू–वर परिचय मेळावा २०२६ उत्साहात झाला. समाजातील विवाहेच्छुक युवक–युवती व त्यांच्या पालकांनी या मेळाव्याला उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक तथा उद्योजक नवनाथ कातोरे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वधू–वर परिचय फॉर्मचे वाटप करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना नवनाथ कातोरे यांनी भारतीय कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करत, विवाहानंतर एकत्र कुटुंब पद्धती जपण्याचा प्रयत्न करावा, कुटुंबातील नाती दृढ ठेवावीत आणि भारतीय संस्कृती व संस्कारांचे जतन करावे, असे भावनिक आवाहन उपस्थित युवक–युवतींना केले.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भरोसा सेलच्या अधिकारी सौ. आयेशा शेख व सौ. पूनम डोंगरे यांनी विवाहापूर्वी जोडीदार निवडताना आवश्यक बाबी, परस्पर समजूतदारपणा, कायदेशीर व सामाजिक पैलू, तसेच सुरक्षित आणि सुदृढ वैवाहिक जीवनासाठी घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

महिला व बालकल्याण समिती सदस्या ॲड. अनुराधा येवले यांनी विवाह जुळविताना व्यवसाय करणारे, उद्योजक तसेच आधुनिक शेती व्यवसायाशी निगडित युवकांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी कुटुंब उभारण्यासाठी हा दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

पत्रकार गोरक्ष बांदल यांनी पत्रिका पाहण्याऐवजी वैद्यकीय चाचण्या व आर्थिक स्थिरता तपासणे आवश्यक आहे, असे सांगितले.

शेकडो विवाह जुळवणारे तात्यासाहेब देशमुख यांनी ज्या युवकांचे तिशी उलटूनही विवाह जुळलेले नाही, त्यांनी क्षुल्लक कारणांमुळे घटस्फोट झालेल्या मुलींचा विचार करावा असे सुचवले.

कार्यक्रमातील प्रश्नोत्तर सत्र विशेष आकर्षण ठरले. उपस्थित युवक–युवती व पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मार्गदर्शकांनी समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे उपस्थितांना उपयुक्त आणि व्यवहार्य मार्गदर्शन लाभले.

विवाहेच्छुक मुला–मुलींनी ९४०४८ ५८९०९ या नंबरवर संपर्क करून नाव नोंदणी करावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे प्रभावी व ओघवते सूत्रसंचालन सौ. प्रतिभा काळे व नंदकुमार काळे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवक यांनी नियोजनबद्ध व अथक परिश्रम घेतले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हा समाजोपयोगी उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रम साठी राजेंद्र उदागे, सुरेश मिसाळ, ॲड. शिवजीत डोके, भरत सुंभे यांचे सहकार्य लाभले.

# अखील भारतीय गांधर्व मंडळाच्या परिक्षेत शिवरंजन संगितालयाचे यश

नगर – एप्रिल २०२६ च्या गांधर्व निकेतनने घेतलेल्या शिवरंजन संगितालयाच्या शास्त्रीय गायन परिक्षेत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

प्रारंभिक परिक्षेत सुप्रिया शेंडगे, आरवी जगताप, द्वारका जोरवर यांनी प्रथम श्रेणीत तर सुखदा गायकवाड, सई गणेश रडे, ओमांश बोली हे विद्यार्थी विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झाले आहेत. तर प्रवेशिका प्रथम मध्ये राधा यादव, काजल आसावणे, बलराम यादव, कैवल्य कुलकर्णी, सर्वज्ञ शेंडगे यांनी प्रथम श्रेणीत तर श्रद्धा काळे, स्वरांगी जायगुडे, स्वरा मोरे हे विद्यार्थी विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झाले आहेत. मध्यमा प्रथम परिक्षेत गौरी इंगळे, मध्यमा पुर्ण परिक्षेमध्ये पुनम इंगळे व विशारद प्रथम मध्ये सौदागर लोंडे हे अनुक्रमे द्वितीय व प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यार्थ्यांना संचालक प्रकाश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कैलास चुटके यांनी अभिनंदन केले.

# प्रत्येक गावाचा किमान १० वर्षांचा विकास आराखडा बनविणे आवश्यक


विनायक देशमुख

नगर – गावांचा शाश्वत विकास होण्यासाठी प्रत्येक गावाचा किमान दहा वर्षाचा विकास आराखडा बनविणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा जिल्हा नियोजन समितीचे नामनिर्देशित सदस्य विनायक देशमुख यांनी व्यक्त केली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या शिफारशीनुसार राज्य सरकारने श्री.देशमुख यांची नुकतीच जिल्हा नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानंतर श्री.देशमुख यांनी जिल्हा विकास व नियोजनाबाबत आपली भुमिका मांडली.

जिल्ह्याच्या विकासाबाबत बोलताना श्री.देशमुख म्हणाले, गावांचा शाश्वत विकास हाच जिल्ह्याच्या विकासाचा पाया आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून त्यादृष्टीने काम होणे आवश्यक आहे. यासंदर्भात ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्याशी आपण प्राथमिक चर्चा केली असुन याबाबतचा तपशीलवार प्रस्ताव आपण लवकरच ना. राधाकृष्ण विखे पा. आणि जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना सादर करणार आहोत.

वाढत्या नागरीकरणामुळे स्वच्छ, सुंदर गावे देखील आता बकाल होत चालली आहेत. कोणत्याही गावात प्रवेश करताना रस्त्याच्या दुतर्फा आता प्लॅस्टिक कचरा व दुर्गंधीचे साम्राज्य आढळून येते. याशिवाय गावात घराघरातील सांडपाणी रस्त्यावर आलेले आढळून येते. पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने या अत्यंत गंभीर बाबी आहेत. या समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाने ग्रामसभेच्या माध्यमातून व गावातील शिक्षित तरुणांच्या सहकार्याने गावाचा आगामी दहा वर्षांचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे. या आराखड्याच्या माध्यमातून दहा वर्षाची विकासाची उद्दिष्टे निश्चित करुन गावाच्या नेतृत्वाने त्याचा पाठपुरावा केल्यास गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकेल. रस्ते, पाणीयोजना, इमारत बांधकाम, जलसंधारण अशा कामासाठी निधीची आवश्यकता असते. मात्र याशिवाय अनेक कामे जनजागृती व लोकसहभागातून करता येणे शक्य आहे. गावाने दहा वर्षासाठी प्लॅस्टिक मुक्त गाव, कचरा, सांडपाणी व्यवस्थापन व प्रक्रिया, प्रत्येक कुटुंबात सौर उर्जेचा वापर, प्रत्येक कुटुंबाला घरपोच शुध्द (आर.ओ. वॉटर) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा याशिवाय महिला सक्षमीकरण, महिला व युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम व त्यामाध्यमातून प्रत्येकाच्या हाताला काम, गावातील १००% एकल महिलांना उत्पन्नाचे साधन निर्माण करणे, प्रतिवर्षी गावाच्या लोकसंख्येएवढ्या झाडांचे वृक्षारोपण व संवर्धन करणे, ग्रामोद्योगाच्या माध्यमातून कृषी उत्पादन आधारित प्रक्रिया उद्योगाला बचत गटांच्या माध्यमातून चालना देणे अशी अनेक उद्दिष्टे निश्चित करता येतील.

### प्रत्येक तालुक्यातील एका गावाची निवड करणार : देशमुख

ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात राज्याला आदर्शवत ठरावे, असे काम करण्याचा आपला निर्धार असुन दहा वर्षांचा विकासाचा आराखडा बनविण्यासाठी इच्छुक असलेल्या गावांपैकी प्रत्येक तालुक्यातील एका गावाची निवड करण्याचा मानस आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांसह स्वयंसेवी संस्था व सी.एस. आर.निधीतुन या गावांचा आगामी दहा वर्षांचा विकास आराखडा बनविण्याचा प्रयत्न असुन हे आराखडे जिल्हा नियोजन समितीला सादर करण्यात येतील, श्री.देशमुख यांनी सांगितले.

# वृक्षारोपण : रोटरी प्रियदर्शनीचा उपक्रम


रोटरी प्रियदर्शनीतर्फे वृक्षारोपण करण्यात आले.

नगर – अहिल्यानगर येथील रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी व निसर्ग आणि पर्यावरण प्रदूषण मंडळ शहर पातळी यांनी संयुक्तिकपणे नुकतेच अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरातील म.ए .सो. चे रेणाविकर माध्यमिक विद्यालय अहिल्यानगर या शाळेच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपण केले. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीने रोप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केलेले आहे. त्या निमित्ताने क्लब ने २५ विविध प्रकारच्या देशी झाडांचे यावेळी वृक्षारोपण केले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि जैवविविधतेच्या संवर्धनासाठी व चालना देण्यासाठी रोटरी प्रियदर्शनी सातत्याने प्रयत्नशील आहे. भविष्यात शुद्ध हवेची उपलब्धता टिकून ठेवण्यासाठी हा उपक्रम आम्ही राबवत असतो, असे रोटरी प्रियदर्शनीच्या पास्ट प्रेसिडेंट रोटेरियन गीता गिल्डा यांनी यावेळी सांगितले. व मुलांना मार्गदर्शन केले.

तापमान वाढ आणि प्रदूषण होत असताना झाडांचे महत्त्व जाणून घेऊन वृक्षारोपण व त्याचे संवर्धन करण्यासाठी रोटरी प्रियदर्शनीचा पुढाकार कौतुकास्पद आहे अशा शब्दात शाळेचे मुख्याध्यापक प्राध्यापक चंद्रकांत गवळे यांनी क्लबचा गौरव केला.

जसे झाड लावणे महत्त्वाचे आहे तसेच त्याचे पालन पोषण करणेदेखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे क्लबच्या नूतन अध्यक्षा रोटेरियनन प्रभा खंडेलवाल यांनी वृक्षारोपण केलेल्या रोपांची काळजी घेऊन त्याची निगा राखणाऱ्या विद्यार्थी गटाला बक्षीस देण्याचे याप्रसंगी जाहीर केले. शाळेने आयोजित केलेल्या वृक्षदिंडीमध्ये रोटरीच्या सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन दिंडीचा आनंद लुटला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या अध्यापिका सौ. स्नेहल उपाध्ये यांनी केले. यावेळी म.ए. सो. चे रेणावीकर माध्यमिक विद्यालयाचे ज्येष्ठ अध्यापक भालसिंग, बोरुडे सर, शिक्षक प्रतिनिधी सौ. अश्विनी कुलकर्णी व स्नेहल उपाध्ये हे उपस्थित होते. तसेच रोटरी प्रियदर्शनीच्या अध्यक्षा प्रभा खंडेलवाल, सेक्रेटरी सुरेखा मणियार यांच्यासह रोटेरियन गीता गील्डा, रोटेरियन सविता काळे, रोटेरियन मंजू मुनोत, रोटेरियन रजनी भंडारी, रोटेरियन स्मिता लोढा, रोटेरियन अर्चना कुलकर्णी, रोटेरियन विभा तांबडे यावेळी उपस्थित होते.

यावेळी निसर्ग आणि पर्यावरण प्रदूषण मंडळ शहर पातळी च्या अध्यक्षा भारती शेवते व विद्या बडवे या देखील उपस्थित होत्या.

# अर्थजगत

**म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीसाठी सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन म्हणजेच एसआयपी हा सध्याचा सर्वात लोकप्रिय मार्ग बनला आहे. दरमहा ठराविक रक्कम गुंतवून दीर्घकाळात मोठी संपत्ती निर्माण करता येते, या विश्वासाने करोडो भारतीय गुंतवणूकदार या मार्गाकडे वळले आहेत. मात्र, या प्रचंड लोकप्रियतेच्या मागे एक मोठा तांत्रिक गैरसमजही तितकाच वेगाने पसरत आहे की, सर्वच प्रकारच्या म्युच्युअल फंडांमध्ये एसआयपी सारखीच प्रभावी आणि फायदेशीर ठरते. हे पूर्णपणे सत्य नाही; कारण फंडाचे स्वरूप, त्याची मालमत्ता आणि बाजाराची चाल यावर एसआयपीचा परतावा अवलंबून असतो.**

## एसआयपी प्रत्येक फंडात फायदेशीर ठरते?




■ गुंतवणूक

सर्व प्रकारच्या फंडांमध्ये एसआयपी का चालत नाही, हे समजून घेण्यासाठी रुपी कॉस्ट एव्हरेजिंग हे त्याचे मूळ तत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. जेव्हा बाजार घसरतो, तेव्हा एसआयपीच्या ठराविक रकमेत फंडाचे जास्त युनिट्स खरेदी केले जातात आणि जेव्हा बाजार वाढतो, तेव्हा कमी युनिट्स मिळतात. यामुळे खरेदीची सरासरी किंमत संतुलित होते. परंतु, ज्या फंडांमध्ये चढ-उतार नसतात किंवा जे फंड अत्यंत एकांगी असतात, तिथे हे तत्त्व निरुपयोगी ठरते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे डेट फंड आणि लिक्विड फंड. या फंडांमध्ये गुंतवणूक प्रामुख्याने सरकारी रोखे किंवा कॉर्पोरेट बाँडस्‌मध्ये केली जाते, जिथे मूल्य स्थिर राहते. या स्थिरतेमुळे किमतीची सरासरी होण्यास वाव नसतो. परिणामी, डेट किंवा लिक्विड फंडात दरमहा एसआयपी करत राहण्यापेक्षा सुरुवातीलाच एकरकमी गुंतवणूक करणे अधिक जास्त फायदेशीर ठरते. कारण तिथे चक्रवाढ व्याजाचा फायदा पहिल्या दिवसापासून पूर्ण रकमेवर मिळतो.

दुसरीकडे, थिमॅटिक आणि सेक्टरल फंड (विशिष्ट उद्योग क्षेत्रांवर आधारित फंड, जसे की आयटी, फार्मा किंवा ऊर्जा क्षेत्र) यांच्या बाबतीत एसआयपी अनेकदा अपयशी ठरू शकते. हे फंड चक्राकार पद्धतीचे असतात. एखादे क्षेत्र मंदीत जाते, तेव्हा ते सलग ३ ते ५ वर्षे नकारात्मक परतावा देऊ शकते. अशा वेळी मंदीच्या सुरुवातीला एसआयपी सुरू झाली, तर गुंतवणूकदाराचा संयम सुटतो आणि तो एसआयपी बंद करतो. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत जागतिक घडामोडींमुळे बाजारात झालेली मोठी पडझड हे याचे ताजे उदाहरण आहे. अशा क्षेत्रांमध्ये मंदी तळाला असते, तेव्हा एकरकमी मोठी गुंतवणूक करणे आणि तेजी येताच ती काढून घेणे हाच एकमेव यशस्वी मार्ग असतो, जो एसआयपीच्या शिस्तबद्ध नियमात बसत नाही.

एखादी व्यक्ती एसआयपी सुरू करते, तेव्हा पहिल्या ३ ते ४ वर्षांत एकूण जमा झालेली रक्कम खूप लहान असते. अशा वेळी बाजारात मोठी घसरण झाली, तर पोर्टफोलिओ थेट उणे दिसू लागतो आणि गुंतवणूकदाराला वाटते की एसआयपीचा काहीच फायदा होत नाही. परंतु, हा काळ संपत्ती निर्मितीचा नसून केवळ युनिट्स गोळा करण्याचा असतो.

हा कालावधी ७ ते १० वर्षांच्या पुढे जातो, तेव्हाच चक्रवाढ शक्तीचा खरा प्रभाव दिसू लागतो. म्हणूनच, दीर्घकालीन इक्विटी फंड, लार्ज-कॅप, मिड-कॅप किंवा फ्लेक्सी-कॅप फंडांमध्येच एसआयपी आपले पूर्ण कौशल्य दाखवू शकते, कारण तिथेच बाजारातील अस्थिरतेचे रूपांतर नफ्यात करण्याची क्षमता असते.

### परतावा मोजण्याचे सूत्र

- अनेक गुंतवणूकदार आपल्या एसआयपीचा परतावा मोजताना 'सीएजीआर' म्हणजेच चक्रवाढ वार्षिक वृद्धी दर पाहतात. परंतु, एसआयपीसाठी सीएजीआर हा निकष पूर्णपणे चुकीचा आणि दिशाभूल करणारा ठरतो.
- एसआयपीमधील प्रत्येक हप्ता हा एका वेगवेगळ्या तारखेला आणि वेगवेगळ्या किमतीला गुंतवला जातो. म्हणजेच, तुमच्या पाच वर्षांच्या एसआयपीमधील पहिल्या हप्त्याला वाढण्यासाठी पाच वर्षे मिळाली, तर शेवटच्या हप्त्याला फक्त एक महिना मिळाला.
- म्हणूनच, एसआयपीचा खरा आणि अचूक परतावा मोजण्यासाठी एक्सआयआरआर म्हणजेच एक्स्टेंडेड इंटरनल रेट ऑफ रिटर्न हाच निकष वापरावा लागतो. हे तांत्रिक वास्तव नीट न समजल्यामुळे अनेकदा गुंतवणूकदार आपला परतावा चुकीचा गृहीत धरतात.




## डेबिट कार्ड ईएमआय आणि सिबिल स्कोर

**बदलती जीवनशैली आणि वाढत्या महागाईच्या काळात इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, लॅपटॉप किंवा महागडे स्मार्टफोन खरेदी करणे सामान्यांसाठी मोठे आर्थिक आव्हान ठरत आहे. अशा वेळी इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंट म्हणजेच ईएमआय हा पर्याय ग्राहकांसाठी मोठा दिलासा ठरतो. आतापर्यंत ईएमआयचा थेट संबंध केवळ क्रेडिट कार्डशी जोडला जात होता. परंतु, ज्यांच्याकडे क्रेडिट कार्ड नाही, अशा ग्राहकांसाठी आता बँका आणि ई-कॉमर्स संकेतस्थळांनी डेबिट कार्ड ईएमआय हा एक उत्तम पर्याय उपलब्ध करून दिला आहे.**

**डेबिट कार्ड ईएमआय म्हणजे काय?** : क्रेडिट कार्डवरील ईएमआयमुळे सिबिल स्कोर सुधारतो हे सर्वश्रुत आहे, परंतु डेबिट कार्डवर ईएमआय घेतल्यास सिबिल स्कोर वाढतो का, हा प्रश्न अनेकांच्या मनात असतो. बँकिंग तज्ज्ञांच्या मते, याचे उत्तर हो असे आहे; मात्र या सुविधेचा वापर करण्यापूर्वी त्यामागील तांत्रिक स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे. ही क्रेडिट कार्डसारखी कोणतीही पूर्वनिर्धारित पत मर्यादा (क्रेडिट लिमिट) नसलेली सुविधा आहे. जेव्हा तुम्ही एखादी वस्तू डेबिट कार्ड ईएमआयवर खरेदी करता, तेव्हा बँक तुमच्या वतीने त्या वस्तूची पूर्ण रक्कम संबंधित व्यापाऱ्याला त्वरित अदा करते.

**बँक खात्यातून पैसे कसे वळवले जातात?** : त्यानंतर बँक तुमच्या बँक खात्याच्या क्षमतेनुसार ६, १२ किंवा २४ महिन्यांच्या कालावधीत व्याजासह ती रक्कम सुलभ हप्त्यांमध्ये वसूल करते. समजा तुम्ही ७५,००० रुपयांचा एक लॅपटॉप खरेदी केला, तर तुमच्या बचत खात्यातून (सेव्हिंग्ज अकाउंट) एकाच वेळी संपूर्ण रक्कम वजा होत नाही. त्याऐवजी, तुम्ही निवडलेल्या कालावधीनुसार दरमहा एक निश्चित रक्कम तुमच्या खात्यातून ऑटो-डेबिट केली जाते.

**सिबिल स्कोरवर होणारा सकारात्मक परिणाम** : या सुविधेचा सिबिल स्कोरवर कसा परिणाम होतो, हे पाहणे रंजक आहे. कर्ज माहिती कंपन्या आणि बँका डेबिट कार्ड ईएमआयला एक प्रकारे असुरक्षित वैयक्तिक कर्ज (अनसिक्युअर्ड पर्सनल लोन) किंवा लहान मुदतीचे कर्ज मानतात. जेव्हा बँक तुम्हाला ही सुविधा देते, तेव्हा त्याची नोंद तुमच्या क्रेडिट रिपोर्टमध्ये एक चालू कर्ज म्हणून होते. जर तुम्ही दरमहा ठराविक तारखेला तुमच्या खात्यातून या ईएमआयचे हप्ते वेळेवर भरले, तर तुमची क्रेडिट हिस्ट्री अत्यंत मजबूत होते. पर्यायाने, यामुळे तुमचा सिबिल स्कोर वेगाने सुधारण्यास मदत होते, ज्याचा फायदा भविष्यात मोठे गृहकर्ज किंवा वाहन कर्ज घेताना होतो. स्टेट बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक आणि ॲक्सिस बँक यांसारख्या देशातील आघाडीच्या बँका आपल्या पात्र ग्राहकांना ही सुविधा देत आहेत.


### हप्ते चुकल्यास होणारे नुकसान

आर्थिक विश्लेषक असा सल्ला देतात की, कोणत्याही प्रकारची ईएमआय खरेदी करताना सर्व चालू हप्त्यांची एकूण रक्कम तुमच्या मासिक उत्पन्नाच्या ४० ते ५० टक्क्यांपेक्षा जास्त नसावी. जर खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे डेबिट कार्डचा ईएमआय बाऊन्स झाला, तर केवळ बँक दंड आकारत नाही, तर सिबिल स्कोरवरही त्याचा अत्यंत नकारात्मक परिणाम होतो. थोडक्यात, डेबिट कार्ड ईएमआय हा क्रेडिट कार्ड नसलेल्यांसाठी सिबिल स्कोर उभारण्याचा एक उत्तम मार्ग असला, तरी खात्यातील शिल्लक रकमेचे शिस्तबद्ध नियोजन करूनच त्याचा वापर करावा.

**'नो कॉस्ट ईएमआय'मधील छुपे शुल्क** : खरेदी करताना जरी नो कॉस्ट ईएमआयचा पर्याय दिसत असला, तरी ग्राहकांनी सावध राहणे गरजेचे आहे. अनेकदा अशा योजनांमध्ये व्याज आकारले जात नसले, तरी बँकांकडून वन-टाईम प्रोसेसिंग फी आणि त्यावर वस्तू व सेवा कर (जीएसटी) वसूल केला जातो. त्यामुळे नो-कॉस्ट असूनही काही अतिरिक्त शुल्क द्यावेच लागते.

## रिटायरमेंट प्लॅनिंगमधील भांडवल संरक्षण

तरुण वयात नोकरी किंवा व्यवसायाला सुरुवात करताना सेवानिवृत्ती हा विषय खूप दूरचा वाटतो. वाढते आयुर्मान, राहणीमानाचा बदलता दर्जा आणि वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च लक्षात घेता, तरुण वयातच सेवानिवृत्तीचे चोख नियोजन करणे ही काळाची गरज बनली आहे. तज्ज्ञांच्या मते, सुरुवातीच्या काळात आक्रमक वाढीवर लक्ष केंद्रित करणे आणि निवृत्तीच्या जवळ पोहोचताना भांडवल संरक्षणाकडे वळणे हाच यशस्वी आर्थिक प्रवासाचा सुवर्णमार्ग आहे.




कारकीर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्याला संपत्ती निर्मितीचा काळ म्हटले जाते. या काळात गुंतवणूकदाराकडे नियमित उत्पन्नाचा स्रोत असतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुंतवणुकीसाठी मोठा कालावधी उपलब्ध असतो. या टप्प्यावर पोर्टफोलिओमध्ये इक्विटी म्हणजेच शेअर बाजाराशी संबंधित साधनांचे प्रमाण जास्त असणे आवश्यक आहे. इक्विटीमधील अस्थिरता दीर्घकाळात संपत्ती वाढवण्यास मदत करते. या काळात गुंतवणूकदारांनी प्रामुख्याने ॲक्टिव्ह डायव्हर्सिफाइड इक्विटी फंड, फ्लेक्सी-कॅप, लार्ज आणि मिड-कॅप तसेच रणनीती-आधारित फंडांमध्ये गुंतवणूक करणे फायदेशीर ठरते. या काळात बाजारातील चढ-उतारांचा थेट फायदा 'रुपी कॉस्ट एव्हरेजिंग'द्वारे घेता येतो. यासोबतच, नियमितपणे एसआयपीच्या रकमेत वाढ करणे आणि शक्य असेल तेव्हा एकरकमी गुंतवणूक करत राहणे आवश्यक आहे, जेणेकरून वाढत्या महागाईशी सामना करू शकणारा मोठा निधी तयार होईल.


गुंतवणुकीचा पोर्टफोलिओ कितीही भक्कम असला, तरी त्याला विम्याच्या सुरक्षा कवचाची अत्यंत गरज असते. योग्य आरोग्य विमा घेतल्यास भविष्यातील वैद्यकीय आणीबाणीच्या काळात जमा झालेला निवृत्तीचा निधी खर्च होत नाही. तसेच, कुटुंबातील अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेसाठी पुरेसा जीवन विमा असणे गरजेचे आहे. याशिवाय, कोणत्याही अनपेक्षित संकट काळात मुख्य गुंतवणुकीला हात लावावा लागू नये, म्हणून एक स्वतंत्र आपत्कालीन निधी तयार ठेवणे पोर्टफोलिओच्या स्थिरतेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

जसजसे गुंतवणूकदार निवृत्तीच्या वयाजवळ पोहोचतात, तसतसे त्यांचे उद्दिष्ट बदलणे गरजेचे आहे. या टप्प्यावर जमा झालेल्या निधीचे रक्षण करणे हे मुख्य ध्येय बनते. निवृत्तीनंतर पोर्टफोलिओची रचना इक्विटी आणि डेट (कर्जरोखे) अशा दोन्ही साधनांमध्ये संतुलित असायला हवी. यामुळे बाजारातील अस्थिरतेचा निवृत्ती निधीवर मोठा आघात होत नाही.

## 'एसी'चा स्फोट आणि गृहविमा

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे किंवा सातत्याने होणाऱ्या अतिवापरामुळे घरांमधील एअर कंडिशनर म्हणजेच एसी ब्लास्ट (धमाका) होण्याच्या आणि त्यामुळे घरात आग लागण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. अशा अनपेक्षित अपघातामुळे घराचे आणि त्यातील महागड्या वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. या पार्श्वभूमीवर, जर घरात एसी ब्लास्ट झाला, तर गृह विमा पॉलिसी अंतर्गत त्याचे आर्थिक संरक्षण मिळते का? असा प्रश्न अनेक गुंतवणूकदार आणि घरमालकांच्या मनात उपस्थित होत आहे.

भारतात मिळणाऱ्या बहुतांश 'स्टँडर्ड होम इन्शुरन्स' पॉलिसींमध्ये आग आणि अनपेक्षित विमोचन किंवा स्फोट या जोखमींचा प्रामुख्याने समावेश असतो. एसी ब्लास्टमुळे लागलेल्या आगीत जर घराच्या भिंती, छप्पर, खिडक्या किंवा खिडक्यांच्या काचा यांचे नुकसान झाले, तर त्याचा दुरुस्ती खर्च विमा कंपनीद्वारे कव्हर केला जातो.



तुमच्याकडे होम कंटेंट इन्शुरन्स (घरातील वस्तूंचा विमा) असेल, तर आगीमुळे जळून खाक झालेले फर्निचर, कपडे, इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे आणि मौल्यवान वस्तूंचे झालेले नुकसानही पॉलिसीच्या अटींनुसार भरून दिले जाते. मूळ होम इन्शुरन्स पॉलिसी ही आगीमुळे झालेल्या 'दुय्यम नुकसानीची' भरपाई करते. ज्या एसी युनिटमध्ये ब्लास्ट झाला आहे, त्या स्वतः एसीच्या नुकसानीचा क्लेम मूळ पॉलिसीमध्ये नाकारला जाऊ शकतो. तुम्हाला स्वतः एसी युनिटचाही क्लेम हवा असेल, तर मूळ पॉलिसी घेताना 'अप्लायन्स ब्रेकडाऊन कव्हर' किंवा 'इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट इन्शुरन्स' हा ॲड-ऑन (अतिरिक्त पर्याय) जोडणे अनिवार्य आहे. या ॲड-ऑनमुळे शॉर्ट सर्किट किंवा तांत्रिक बिघाडामुळे खराब झालेल्या एसीचा दुरुस्ती किंवा बदली खर्च मिळू शकतो.

### कोणत्या परिस्थितीत क्लेम नाकारला जाऊ शकतो?

**विमा कंपन्या सर्वच प्रकारच्या एसी ब्लास्टचा क्लेम डोळे झाकून मंजूर करत नाहीत. एसीमध्ये आधीपासूनच गॅस गळती किंवा वायरिंग खराब असल्याचे माहीत असूनही ग्राहकाने त्याकडे दुर्लक्ष केले असेल किंवा अनेक वर्षांपासून एसीची नियमित सर्व्हिसिंग केली नसेल, तर विमा कंपनी क्लेम नाकारू शकते. अतिशय जुने, गंजलेले आणि वापरण्यास अयोग्य असलेले एसी युनिट वापरल्यामुळे अपघात झाल्यास कंपन्या चौकशीअंती क्लेम नाकारतात. विमा लाटण्याच्या उद्देशाने किंवा इतर कोणत्याही कारणाने जाणूनबुजून लावलेली आग कव्हर केली जात नाही.**

**म्युच्युअल फंड क्षेत्रात सध्या सेक्टोरल आणि थीमॅटिक फंडांची (विशिष्ट उद्योग क्षेत्रांवर आधारित फंड, जसे की इन्फ्रास्ट्रक्चर, बँकिंग, फार्मा किंवा तंत्रज्ञान) प्रचंड चलती आहे. अनेक गुंतवणूकदार एखाद्या क्षेत्रातील सलग वाढ पाहून आकर्षित होतात आणि त्यात मोठी रक्कम गुंतवतात. परंतु, आयसीआयसीआय प्रुडेन्शियलच्या विश्लेषणानुसार, अशा विशिष्ट क्षेत्रांच्या व्यावसायिक चक्राचा अचूक अंदाज लावणे आणि त्यानुसार गुंतवणुकीची वेळ साधणे हे सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक असते.**

## थिमॅटिक गुंतवणुकीतील टायमिंगचा चक्रव्यूह

**सेक्टोरल सायकल म्हणजे काय?** प्रत्येक उद्योग क्षेत्राची कामगिरी एका विशिष्ट चक्रातून जात असते. यामध्ये प्रामुख्याने चार टप्पे असतात: मंदी, संथ सुधारणा, वेगवान तेजी आणि पुन्हा घसरण. उदाहरणार्थ, एखादे क्षेत्र जेव्हा व्यावसायिक मंदीच्या तळाशी असते, तेव्हा त्याचे शेअर्स खूप स्वस्त असतात. परंतु, सर्वसामान्य गुंतवणूकदार मंदीच्या भीतीने त्यात पैसे गुंतवत नाहीत. जेव्हा ते क्षेत्र प्रचंड वेगाने वाढून आपल्या शिखरावर पोहोचते, तेव्हा वर्तमानपत्रांतील बातम्या आणि आकर्षक जुना परतावा पाहून गुंतवणूकदार तिथे एसआयपी किंवा एकरकमी गुंतवणूक सुरू करतात. दुर्दैवाने, हाच काळ त्या क्षेत्राच्या घसरणीचा किंवा संतृप्ततेचा असतो, ज्यामुळे गुंतवणूकदारांना दीर्घकाळ नकारात्मक किंवा अत्यंत कमी परतावा मिळतो.

**टायमिंग साधणे का कठीण ठरते?** अनपेक्षित जागतिक आणि अंतर्गत घटक: एखाद्या क्षेत्राची चाल केवळ देशांतर्गत मागणीवर नव्हे, तर जागतिक घडामोडी, सरकारी धोरणे, व्याजदर आणि कच्च्या मालाच्या किमतींवर अवलंबून असते. या घटकांचा अचूक अंदाज लावणे कोणत्याही सामान्य गुंतवणूकदाराला शक्य होत नाही.

परताव्याची मोठी तफावत: एखादे क्षेत्र जेव्हा मंदीत जाते, तेव्हा ते सलग ३ ते ५ वर्षे कामगिरी करत नाही. फ्लेक्सी-कॅप किंवा लार्ज-कॅप फंडांप्रमाणे इथे फंड मॅनेजरला दुसऱ्या चांगल्या क्षेत्रात पैसे वळवण्याचे स्वातंत्र्य नसते. त्याला त्या विशिष्ट क्षेत्रातच गुंतवणूक ठेवावी लागते, ज्यामुळे पोर्टफोलिओ दीर्घकाळ अडकून पडतो.

**गुंतवणूकदारांचे मानसशास्त्र**

गुंतवणूक विश्वात एक प्रसिद्ध नियम आहे - भूतकाळातील कामगिरी भविष्यातील परताव्याची हमी देत नाही. परंतु, बहुतांश गुंतवणूकदार गेल्या १ ते ३ वर्षांत ज्या सेक्टोरल फंडाने सर्वाधिक परतावा दिला आहे, त्यातच पैसे गुंतवण्याची चूक करतात. याला आर्थिक भाषेत 'रेडिएटर इफेक्ट' किंवा 'परताव्याचा आभास' म्हटले जाते. जेव्हा तुम्ही तेजीच्या शिखरावर प्रवेश करता, तेव्हा नफा मिळण्याची शक्यता कमालीची कमी आणि भांडवल गमावण्याचा धोका सर्वाधिक असतो.



### चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा मार्ग

सेक्टोरल फंडांच्या या चक्रव्यूहात अडकण्यापेक्षा सर्वसामान्य आणि विशेषतः नवीन गुंतवणूकदारांनी काही गोष्टींचा विचार करावा.

- **डायव्हर्सिफाइड फंडांना प्राधान्य:** लार्ज-कॅप, फ्लेक्सी-कॅप किंवा मल्टि-कॅप फंडांमध्ये गुंतवणूक करावी. या फंडांमध्ये अनुभवी फंड मॅनेजर्स बाजाराची स्थिती पाहून कोणत्या क्षेत्रात कधी प्रवेश करायचा आणि कधी बाहेर पडायचे (सेक्टर रोटेशन), याचा निर्णय स्वतः घेतात.
- **मर्यादित वाटप (ॲलोकेशन):** जर तुम्हाला एखाद्या क्षेत्राच्या भविष्यातील वाढीबद्दल खात्री असेल, तर तुमच्या एकूण पोर्टफोलिओच्या केवळ ५ ते १० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम सेक्टोरल फंडात गुंतवू नये.

## 'होमलोन ओव्हरड्राफ्ट' फायदेशीर ठरते का?



आपले हक्काचे घर घेताना बहुतांश व्यक्तींना गृहकर्जाचा आधार घ्यावा लागतो. हे कर्ज दीर्घ मुदतीचे असल्याने त्यावर जाणारे एकूण व्याजही खूप मोठे असते. याच गृहकर्जाचा बोजा आणि व्याज कमी करण्यासाठी बँका आपल्या ग्राहकांना एक विशेष सुविधा देतात, ज्याला 'होम लोन ओव्हरड्राफ्ट' किंवा 'होम लोन ॲडव्हांटेज प्लॅन' म्हटले जाते. नेहमीच्या सामान्य गृहकर्जापेक्षा ही सुविधा थोडी वेगळी आणि लवचिक असते.

या योजनेअंतर्गत, बँक तुमच्या गृहकर्ज खात्याशी जोडलेले एक चालू खाते किंवा विशेष बचत खाते उघडते. यामध्ये ग्राहकाला आपल्या नियमित मासिक हप्त्याव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त रक्कम किंवा अतिरिक्त बचत जमा करण्याची मुभा असते. या खात्यात जमा केलेल्या अतिरिक्त रकमेला 'सरप्लस फंड' म्हटले जाते.



या सुविधेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे व्याजाची होणारी बचत. बँक तुमच्या गृहकर्जाच्या एकूण थकीत रकमेतून तुमच्या ओव्हरड्राफ्ट खात्यात जमा असलेली अतिरिक्त रक्कम वजा करते आणि केवळ उरलेल्या रकमेवरच व्याजाची आकारणी करते.

उदाहरण: जर तुमचे गृहकर्ज ५० लाख रुपये असेल आणि तुम्ही ओव्हरड्राफ्ट खात्यात ५ लाख रुपये अतिरिक्त जमा केले, तर बँक ५० लाख रुपयांऐवजी केवळ ४५ लाख रुपयांवरच व्याज आकारेल. यामुळे तुमच्या कर्जाचा मूळ कालावधीवेगाने कमी होतो आणि लाखो रुपयांच्या व्याजाची बचत होते.

### या सुविधेचे प्रमुख फायदे

- नेहमीच्या गृहकर्जात जर तुम्ही मुदतपूर्व अंशतः पेमेंट (केले, तर ते पैसे बँकेकडे जमा होतात आणि आणीबाणीच्या काळात ते तुम्हाला परत काढता येत नाहीत. परंतु, ओव्हरड्राफ्ट खात्यातील अतिरिक्त ५ लाख रुपये तुम्ही तुमच्या गरजेनुसार कधीही, एटीएम किंवा इंटरनेट बँकिंगद्वारे परत काढू शकता.
- जेव्हा तुमच्याकडे बोनस, व्यवसायातील नफा किंवा इतर माध्यमातून अतिरिक्त उत्पन्न येते, तेव्हा ते तुम्ही या खात्यात ठेवून व्याज वाचवू शकता आणि गरज पडल्यास ते पैसे वापरूही शकता.
- बँका सामान्य गृहकर्जाच्या तुलनेत ओव्हरड्राफ्ट गृहकर्जावर साधारणपणे ०.२५% ते ०.५०% जास्त व्याजदर आकारतात. त्यामुळे जर तुम्ही खात्यात पुरेशी अतिरिक्त रक्कम दीर्घकाळ ठेवणार नसाल, तर या वाढीव व्याजदरामुळे तुम्हाला सुविधेचा कोणताही आर्थिक फायदा मिळत नाही.
- या सुविधेमुळे गृहकर्जाची मुद्दल आणि व्याज वेगाने कमी होत असल्याने, प्राप्तीकर कायद्याच्या कलम २४ (ब) आणि कलम ८०सी अंतर्गत मिळणारी आयकर सवलत कमी होऊ शकते.

# श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करा; तोफखाना पोलिस स्टेशनमध्ये 'वारकरी व टाळकरींसह दिंडी आंदोलन'


### मूह मे राम बगल मे तिजोरी म्हणत दिल्या घोषणा

नगर – अयोध्येतील श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमधील कथित आर्थिक गैरव्यवहार, देणगी निधीचा अपहार, पुरावे नष्ट करणे तसेच संबंधित विश्वस्तांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने सोमवारी तोफखाना पोलिस स्टेशनमध्ये वारकरी, टाळकरी आणि कार्यकर्त्यांसह येऊन आंदोलन करण्यात आले. शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी हातात टाळ, आणि फलक घेऊन मूह मे राम बगल मे तिजोरी श्रीराम मंदिर वाचवा, चोरी करणाऱ्यांना घरी पाठवा, रामभक्तांच्या देणगीचा हिशोब द्या, श्रीरामाच्या नावावर भ्रष्टाचार चालणार नाही अशा घोषणा दिल्या. आंदोलनानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन देऊन संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात नगरसेवक शम्स खान, माजी नगरसेवक फैय्याज शेख, ब्लॉक अध्यक्ष फिरोज खान, शामराव वाघस्कर, अभिजीत कांबळे, संजय झोडगे, ॲड. साहेबराव चौधरी, राजेंद्र कर्डिले, गणेश भोसले, सुनील क्षेत्रे, प्रा. रवी सातपुते, मयूर पाटोळे आदी सहभागी झाले होते.

निवेदनात म्हटले आहे की, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट हा केंद्र शासनाने स्थापन केलेला वैधानिक ट्रस्ट असून देशभरातील कोट्यवधी रामभक्तांनी श्रद्धेने दिलेल्या देणग्यांमधून ट्रस्टकडे मोठ्या प्रमाणात निधी जमा झाला आहे. या सार्वजनिक निधीचा अपहार झाल्याचा संशय असल्याने हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून रामभक्तांच्या श्रद्धेशी आणि सार्वजनिक विश्वासाशी संबंधित गंभीर विषय असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी तोफखाना पोलिस ठाण्यावर वारकरी–टाळकरींसह दिंडी आंदोलन केले.

निवेदनात ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्यगोपाल दास, सरचिटणीस चंपत राय, विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा, कोषाध्यक्ष गोविंददेव गिरी, अधिकारी गोपाल राव तसेच इतर संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंडरिंग ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये ट्रस्टला सुमारे ₹३२७ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले. दररोज हजारो भाविकांकडून दानपेट्यांमध्ये जमा होणाऱ्या रकमेच्या व्यवस्थापनात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वीही ट्रस्टच्या जमीन खरेदी व्यवहारांमध्ये कथित अनियमितता झाल्याचे नमूद करून, सुमारे ₹२ कोटी किंमतीची जमीन ₹१८.५ कोटींना खरेदी करण्यात आल्याचा तसेच सरकारी 'नझूल' जमिनीच्या खरेदी व्यवहारातही मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रोख रकमेतील तफावत लक्षात आणून देत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्या जाणीवपूर्वक दुर्लक्षित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. रोख मोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आवश्यक पार्श्वभूमी तपासणी न करता नियुक्ती करण्यात आली, सुरक्षा नियम शिथिल करण्यात आले आणि कर्मचाऱ्यांची तपासणीही टाळण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

निवेदनानुसार, काही कर्मचाऱ्यांना यापूर्वीही चोरी करताना पकडण्यात आले होते. तरीदेखील त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई करण्यात आली नाही. उलट, त्यांना संरक्षण दिल्यामुळे अवघ्या चाळीस दिवसांत सुमारे ७० चोरीच्या घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय, रोख रक्कम लपविणे आणि सिसिटीव्ही कॅमेरे झाकण्याचे प्रकार गुप्त कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्यानंतरही पोलिसांना तत्काळ माहिती न देता अंतर्गत चौकशी करण्यात आली. या काळात काही डिजिटल उउद्धत पुरावे नष्ट करण्यात आल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, जून २०२६ मध्ये अंतर्गत कारवाईदरम्यान एका कर्मचाऱ्याकडून सुमारे ₹५८ लाखांची रोख रक्कम जप्त करण्यात आली होती. मात्र, एवढी मोठी रक्कम हस्तगत होऊनही संबंधितांविरुद्ध तात्काळ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्यानंतर काही व्हिसलब्लोअर्स आणि सार्वजनिक प्रतिनिधींनी हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर उशिराने FIR दाखल करण्यात आला. मात्र त्यामध्ये केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांनाच आरोपी करण्यात आले असून वरिष्ठ व्यवस्थापनाला वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतल्यानंतर ट्रस्टच्या दैनंदिन बँक ठेवींमध्ये मोठी वाढ झाल्याचा उल्लेख करून, यापूर्वी दररोज लाखो रुपयांचा अपहार होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व आर्थिक व्यवहारांची अंमलबजावणी संचालनालय मार्फतही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना दीप चव्हाण म्हणाले, श्रीराम हे देशातील कोट्यवधी नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र आहेत. रामभक्तांनी विश्वासाने दिलेल्या देणग्यांचा अपहार झाला असेल, तर तो कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. आमचे आंदोलन कोणत्याही धर्माविरोधात नसून भ्रष्टाचाराविरोधात आहे. श्रीराम मंदिराची पवित्रता, रामभक्तांचा विश्वास आणि सार्वजनिक निधीचे संरक्षण करण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करावेत आणि आवश्यक असल्यास 'ईडी'मार्फतही तपास करण्यात यावा.

आंदोलनानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या प्रकरणात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १७३ (१) अंतर्गत प्रथम माहिती अहवाल नोंदवून सर्व संबंधितांविरुद्ध निष्पक्ष, सखोल आणि वेळेत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.



## आध्यात्मिक गुरू आणि शांतता दूत आचार्य डॉ. लोकेश मुनी यांना निमंत्रण

गुरुग्राम येथील 'वर्ल्ड पीस सेंटर मध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वसंत विहार सेवा केंद्र प्रभारी बीके क्षीरा दीदी, बीके डॉ. सुरेंद्र गोयल, बीके विकास आणि बीके डॉ. दीपक हरके यांनी आध्यात्मिक गुरू आणि शांतता दूत आचार्य डॉ. लोकेश मुनी यांची सौहार्दपूर्ण भेट घेतली. ते गेल्या ३० वर्षांपासून समाजात जातीय सलोखा, अहिंसा, शांतता आणि परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी अविरत प्रयत्नशील आहेत. या प्रसंगी बी.के. क्षीरा दीदींनी त्यांना ईश्वरीय सौगात, स्लोगन ची फ्रेम, वरदान कार्ड आणि 'टोली' (पवित्र प्रसाद) भेट दिले तसेच त्यांना राजस्थानमधील आबू राज येथील संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालयाला भेट देण्याचे निमंत्रण दिले.

## पान व्यापारी महासंघाचा १४ जुलै रोजी आझाद मैदान, मुंबई येथे मोर्चा

### चलो आझाद मैदान, चलो मुंबई'चे आवाहन कायम राज्यभरातील पान दुकान बंद ठेवून सहभागी होण्याचे आवाहन

नगर – महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर १४ जुलै रोजी सकाळी १० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे. याबाबत महासंघाने नव्याने पत्रक प्रसिद्ध करून राज्यातील सर्व पान शॉप बंद करून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन तसेच इतर यंत्रणांकडून पान दुकानदारांवर होत असलेल्या कारवायांविरोधात हा मोर्चा काढण्यात येत आहे. राज्यभरातील पान शॉप व्यावसायिकांनी १४ जुलै रोजी आपला व्यवसाय बंद ठेवून मुंबईतील आझाद मैदानावर एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या अन्यायकारक कारवाया तात्काळ थांबवाव्यात तसेच सुगंधी तंबाखूवरील बंदीबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा.

पानपट्टी चालकांवर होणाऱ्या बेकायदेशीर कारवाया थांबवाव्यात. पोलिसांकडून होणारा चुकीच्या मोक्का कायद्याचा वापर रोखावा. पान शॉप व्यावसायिकांना अनुदान व विनातारण कर्ज उपलब्ध करून द्यावे. प्रत्येक पान दुकानदाराच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय अथवा निमशासकीय सेवेत संधी द्यावी. पान व्यवसायाच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करावी.

या राज्यव्यापी आंदोलनाचे नेतृत्व प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी, कार्याध्यक्ष शरद मोरे, तांत्रिक सल्लागार हेमंग शहा, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी, महेश मुर्तडकर, लातूर जिल्हाध्यक्ष मसूद काझी, सांगली जिल्हाध्यक्ष रत्नाकर नांगरे यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी करीत असून, पान शॉप व्यावसायिकांनी सोमवारी रात्री ११ वाजता माळीवाडा बस स्थानक जवळून आंदोलनाला जाण्याची सुरुवात होणार असून सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



नगर शहरात २ मावा कारखान्यांवर छापा टाकून मुद्देमालासह दोघांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## नगरमध्ये मावा तयार करणाऱ्या दोन कारखान्यांवर छापा

### पोलिसांकडून लाखाचा मुद्देमाल जप्त, दोघा जणांविरुद्ध गुन्हे दाखल

नगर – शहरातील तपोवन रस्ता, सूर्यनगर परिसरात घरातून अवैधरित्या मावा तयार करून त्याची विक्री करणार्या दोन ठिकाणांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १२जुलै रोजी पहाटे कारवाई केली. या कारवाईत सुमारे ९९ हजार ७०० रूपयांचा सुगंधित तंबाखू, तयार मावा, बारीक सुपारी, मावा तयार करण्यासाठी वापरली जाणारी इलेक्ट्रिक व लोखंडी मशीन तसेच प्लास्टिकच्या पुड्यांसह विविध साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी दोघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्यासह अंमलदार सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, किशोर शिरसाठ, सागर ससाणे, मनोज साखरे, सतीश भवर, भगवान धुळे, भाग्यश्री भिटे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पथकाला माहिती मिळाली होती की, तपोवन रस्त्यालगतच्या सूर्यनगर येथील एस.टी. कॉलनी परिसरात सचिन दिलीप पवार (वय ४०) आणि राहुल नवनाथ गिते (वय ३०) हे त्यांच्या राहत्या घरात मशीनच्या साहाय्याने विक्रीस प्रतिबंधित असलेला मावा तयार करून विक्री करत आहेत. या माहितीची खातरजमा करून पथकाने दोन्ही ठिकाणी एकाच वेळी छापा टाकला.

छाप्यादरम्यान दोघेही मावा तयार करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातून सुगंधित तंबाखू व सुपारी मिश्रित मावा, तयार मावा, बारीक सुपारी, मावा तयार करण्यासाठी वापरली जाणारी इलेक्ट्रिक व लोखंडी मशीन तसेच प्लास्टिकच्या पुड्या असा एकूण ९९ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन्ही संशयितांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## नगरमध्ये 'चेनस्नॅचिंग करणारा' सराईत गुन्हेगार पुणे येथून जेरबंद

### सावेडीतील २ गुन्हे आले उघडकीस, १ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त



नगर – शहरातील पाईपलाईन रोडवर एका महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने ओरबाडून नेणाऱ्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे येथून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले आहे. सागर रमेश नागपुरे (रा. सावतानगर भिंगार) असे या पकडलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि रोख रकमेसह एकूण १ लाख ३२ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, ९ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास मानसी जीवन महाजन (रा. अनंत विहार, शिवम कॉलनी, तुळजा भवानी मंदिराजवळ, पाईपलाईन रोड, सावेडी) या आपल्या परिसरातून जात होत्या. त्याच वेळी पाठीमागून मोटारसायकलवर भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात चोरट्याने मानसी यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने ओढून तोडले आणि दुचाकीवरून पळ काढला. या प्रकरणी मानसी महाजन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

भरदिवसा घडलेल्या या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष तपास पथक तयार करण्यात आले. या पथकात पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार सुनील पवार, शाहिद शेख, विष्णू भागवत, फुरकान शेख, प्रकाश मांडगे आणि प्रशांत राठोड यांचा समावेश होता. तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने गुन्ह्याची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. १३ जुलै रोजी पथकाला खात्रीशीर माहिती मिळाली की, सदर गुन्हा हा भिंगार येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार सागर नागपुरे याने केला असून तो सध्या पुणे जिल्ह्यातील कोथरूड भागात लपून बसला आहे.

माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ पुण्याच्या कोथरूड भागात जाऊन शोधमोहीम राबवली. कोथरूड परिसरात संशयास्पदरीत्या फिरत असलेल्या सागर नागपुरे यास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबूली दिली. पोलिसांनी त्याच्या कडून ६२ हजार १९० रुपयांची रोख रक्कम आणि चोरी करताना वापरलेली ७० हजार रुपये किमतीची बजाज मोटारसायकल, असा एकूण १ लाख ३२ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला मुद्देमालासह पुढील कारवाईसाठी तोफखाना पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोगमधील योग साधकांचे अभिप्राय

आरोग्यसंपत्र जीवन कोणाला नको असते ? प्रत्येकाला निरोगी आनंदी जीवन जगावे असे वाटत असते. पण आज समाजातील चित्र फार विचारक आहे. दवाखान्यातील लोंढे आपले मन हेलावून सोडतात. कमी वयात अनेक व्याधींनी ग्रस्त असलेले लोक आपणास पदोपदी पाहावयास मिळतात. समाजाची शैक्षणिक, आर्थिक प्रगती झपाट्याने झाली. प्रत्येक जण यशाचे शिखर गाठण्यासाठी झटू लागला. यामुळे ताणतणावात प्रचंड वाढ झाली. यातून माणसाची मानसिक शांती ढळली. आजही आपण पाहतो अनेक घरांमध्ये आर्थिक सुबत्ता आहे. सर्व सुखसोई आहेत पण आनंद नाही. या धकाधकीच्या आयुष्यामध्ये आपण जगत असताना आपले स्वतःकडे स्वतः च्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत गेले आणि आपण अनेक रोग व्याधी यांच्या उंबरठ्यावर कधी आलो हे आपल्याला समजले देखील नाही.

अशातच या अंधकारमय वातावरणात एक आशेचा किरण उजळला. एक माहिती कानावर आली. 'सर्व व्याधीवर मिरॅकल उपाय'. अधिक माहिती घेता कळले की श्री. मेहेर सर गेल्या ३५ वर्षापासून आनंदऋषीजी हॉस्पिटल शेजारी असलेल्या ब्लड बँकच्या हॉलमध्ये 'आनंद योग सेंटर' चालवतात. या ठिकाणी नियमित योग वर्ग घेतला जातो.

योगाचे महत्व जाणून होतो. अनेकांकडून योगाबद्दल माहितीही मिळाली होती. पण कळत पण वळत नाही या वृत्तीप्रमाणे याकडे दुर्लक्ष करत आलो होतो.

श्री. मेहेर सरांच्या 'आनंद योग सेंटर' चा योगासन वर्ग जॉईन केला आणि थोड्याच दिवसात 'मिरॅकल' शब्द प्रत्यक्षात दिसू लागला. हो माझ्यात होणारे सकारात्मक बदल मला दिसू लागले. मनाला असीम शांतता अनुभवायला लागली. योग्य व्यायामाने जी दुखणी होती ती दूर झाली. सर्वात महत्वाचे म्हणजे स्वतःच शरीर किती मौल्यवान आहे याची जाणीव झाली. आपण आहोत तर सर्व आहे. हे कळून चुकले. जीवनात समस्या येतच राहतील पण आपण तन–मनाने सक्षम असलो तर प्रत्येक समस्येला आपण तोंड देऊ शकतो हे मेहेर सर वेळोवेळी सांगतात. त्याचाही प्रत्यय जगताना आला. या योग वर्गात असलेल्या वातावरणामुळे आनंदी जीवनाची अनुभूती मला मिळाली. योग्य वेळी मेहेर सरांचे मार्गदर्शन मिळाले हे मी माझे भाग्य समजतो. या योगवर्गामुळे दिनचर्येला वेळापत्रक मिळाले. सकाळी लवकर उठण्याची सवय लागली. त्यामुळे रात्री लवकर झोप येऊ लागली. त्यामुळे मोबाईल स्क्रीन वेळ कमी झाला व भविष्यात होणाऱ्या व्याधीला पुर्णविराम मिळाला याचे श्रेयही मी मेहेर सरांना देतो.

या योगवर्गामध्ये अनेक आनंददायी उपक्रमांचे आयोजनही केले जाते. त्यात सहभागी होऊनही माणूस सर्व दुःख विसरुन जातो.

प्रत्येक व्यक्ती निरोगी असावा. तो दिर्घायू असावा यासाठी श्री. मेहेर सरांची तळमळ व करत असलेले कार्य खूपच महान आहे. ज्यांना वर्गाला येणे शक्य नाही त्यांच्यासाठी ऑनलाईन वर्गही घेतले जातात. सर्वांनी या 'आनंद योग सेंटर' च्या योगवर्गाचा लाभ घ्यावा व आपले जीवन निरोगी, आनंदी करावे. निश्चितच आपण आजच निश्चय कराल व आपल्या जीवनातील आनंददायी बदल अनुभवाल अशी आशा बाळगतो.



**– जगन्नाथ कांबळे,**
अरणगाव, अहिल्यानगर

## सोसायटीचे संचालक समजून दुसऱ्याचेच केले कारमधून अपहरण

### चूक लक्षात आल्यावर सोन्याच्या अंगठ्या, चेन काढून घेत दिले रस्त्यात सोडून

नगर – जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोसायटीच्या ठरावासाठी सोसायटीचा संचालक समजून ७ ते ८ अज्ञात व्यक्तींनी एका ५५ वर्षीय किराणा व्यावसायिकाचे भरदिवसा अपहरण केले. मात्र नंतर चूक लक्षात येताच त्याच्या हातातील दोन तोळ्याच्या सोन्याच्या २ अंगठ्या आणि गळ्यातील ५ तोळ्याची सोन्याची चेन हिसकावून घेत त्याला सोडून दिल्याची घटना पारनेर तालुक्यात १२ जुलै रोजी दुपारी घडली. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अशोक फुलाजी चेडे (वय ५५, रा. पारनेर) यांनी रात्री उशिरा फिर्याद दिली आहे. फिर्यादी चेडे हे किराणा व्यावसायिक असून ते वैयक्तिक कामानिमित्त पुणे जिल्ह्यातील चाकण येथे गेले होते. तेथील काम आटोपून ते ज्ञानेश्वर औटी यांच्या मालकीच्या लाल रंगाच्या मारुती ब्रेझा कारने (क्र.एम.एच.–१६ डी.सी. ५५७४) पारनेरकडे परत येत होते. १२ जुलै रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास त्यांची कार नगर ते कल्याण महामार्गाने कर्जुले हर्या शिवारात पिंपळगाव रोठा जाणाऱ्या रस्त्याजवळ आली असता चेडे यांच्या कारला अचानक एका लाल रंगाच्या स्विफ्ट कारच्या चालकाने ओव्हरटेक करून गाडी आडवी मारली. त्याच वेळी उजव्या बाजूने दुसरी पांढऱ्या रंगाची स्विफ्ट कार येऊन थांबली. त्यामुळे चेडे यांच्या चालकाने आपली कार रस्त्याच्या कडेला घेतली. दोन्ही स्विफ्ट गाड्यांमधून उतरलेल्या ७ ते ८ अज्ञात इसमांनी कारमधील चालकाला आणि फिर्यादी चेडे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी अशोक चेडे यांना बळजबरीने ओढत लाल रंगाच्या स्विफ्ट कारमध्ये डांबले आणि मांडओहळ धरणाच्या रस्त्याने धरणाजवळ घेऊन गेले.

अपहरणाच्या या थरारामुळे घाबरलेल्या चेडे यांनी आरोपींना, तुम्ही कोण आहात आणि मला कशासाठी घेऊन जात आहात? असे विचारले. त्यावर आरोपींनी तुम्ही सोसायटीचे संचालक आहात म्हणून आम्ही तुम्हाला घेऊन चाललो आहे असे सांगितले. त्यानंतर आरोपींनी त्यांचे नाव विचारले असता चेडे हे सोसायटीचे संचालक नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर आरोपींनी चेडे यांच्या हातातील दोन तोळे वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या आणि गळ्यातील पाच तोळे वजनाची सोन्याची चेन असे एकूण ७ तोळे दागिने बळजबरीने ओरबाडून घेतले आणि त्यांना रस्त्यात सोडून देऊन पळ काढला.

याप्रकरणी अशोक चेडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पारनेर पोलीस ठाण्यात अज्ञात ७ ते ८ आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४०(३), ११९(१), ११५(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रणजित मारग या प्रकरणाचा पुढील तपास करत असून आरोपींचा शोध घेत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

